

कुलगुरु कै. वि. गं. तथा दादासाहेब केतकर



धनुर्धारी श्रीराम लक्ष्मण

स्थापना १२ मे १९०९



शिक्षणमहर्षी कै. डॉ. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर


पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक

# समाचार

Pune Vidyarthi Griha's 'Samachar' Magazine November 2024 - Pages - 68

संपादक : श्री. राजेंद्र विठ्ठल बोऱ्हाडे

कार्यकारी संपादक : श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे

* पुणे * वर्ष ७६ * अंक १ * किंमत रु. १०/- * वार्षिक वर्गणी रु. १००/-





दि. १६ ऑक्टोबर २०२४ रोजी कुलगुरू कै. विष्णु गंगाधर तथा दादासाहेब केतकर यांच्या ७४ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित केलेल्या व्याख्यान प्रसंगी प्रमुख पाहुणे व्याख्याते मा. श्री. सम्राट अविनाश फडणीस, संपादक दै. सकाळ, पुणे यांचा सत्कार करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, समवेत डावीकडून कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ आणि कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ

## * कुलगुरू कै. वि. गं. तथा दादासाहेब केतकर स्मृति व्याख्यानमाला क्षणचित्रे *



कुलगुरू कै. वि. गं. तथा दादासाहेब केतकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून वंदन करताना प्रमुख पाहुणे मा. श्री. सम्राट फडणीस, समवेत कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी



संस्था गौरव गान सादर करताना मुक्तांगण इंग्लिश स्कूल, पुणे येथील विद्यार्थिनी



सौ. गायत्री गिरीष जोशी यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार करताना श्री. सम्राट फडणीस



कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि उपस्थितांचे स्वागत करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे



माध्यमांचे सामाजिक भान या विषयावर आपले विचार मांडताना श्री. सम्राट फडणीस



उपस्थितांचे आभार मानताना कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ





व्याख्यानमालेस उपस्थित संचालक, देणगीदार, हितचिंतक, विविध विभागांचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी

संपादकीय

# युगपुरुष दादासाहेब केतकर

भगवान परशुराम निर्मित कोकणभूमीला निसर्गवैभवाचे वरदान तर लाभले आहे. तसेच ही कोकणभूमी लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी कर्वे, कविवर्य केशवसुत, श्री. रामकृष्ण महाराज जांभेकर, श्री. नामदेव महाराज केळकर, माऊली काशीबाई चव्हाण, शिवप्रभूंच्या मराठी साम्राज्याचे अटकेपार निशाण नेणारी पेशवे मंडळी, आदी अनेकानेक नरनारी रत्नांची खाणच आहे. आधुनिक काळातील त्यापैकीच एक महनीय व्यक्तिमत्त्व म्हणजे आपल्या संस्थेचे कुलगुरू श्री. दादासाहेब केतकर.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी झगडत, आपल्या कुशाग्र बुध्दिमत्तने, समाजकार्याच्या अतीव ओढीने आणि मातृभूमीला पुनरपि समृध्दतेचे गतवैभव लाभावे या हेतूने, 'शहाणे करूनि सोडावे सकल जन' या उद्दिष्टाने दादासाहेबांनी पुणे विद्यार्थी गृहाच्या सेवेसाठी स्वतःला वाहून घेतले.

दिशाहीन झालेल्या समाजाला जर भानावर आणायचे असेल तर, शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. त्यासाठी विशेषतः तरुण पिढीची जडण - घडण बळकट झाली पाहिजे. म्हणनूच दिशाहीन झालेल्या तत्कालीन तरुण पिढीला सुमार्गावर आणण्यासाठी अचूक असलेल्या औषधोपचाररूपी शिक्षणाचे महत्त्व दादासाहेबांनी ओळखले होते. त्याकाळच्या ब्रिटिश शिक्षण पध्दतीबद्दल दादांचे मत होते, 'शिक्षणाच्या नावाखाली सरकारने आपल्या देशाचे अंतःकरणच साफ मारून टाकलं आहे. शरीर मेलं तर, दुःख नाही, मन जिवंत असेल तर, त्यात प्राण भरता येतील परंतु मन मेल्यावर काय करणार ? म्हणून हे सरकारी शिक्षण मुळापासून उपटून त्या ऐवजी नव्या पिढीला राष्ट्रीय शिक्षण दिले पाहिजे. तळमळ असेल तर, ताकद येते. काहीही जमतं'. या विचाराने दादांनी पुणे विद्यार्थी गृहाचा शैक्षणिक वारसा आणि वसा जोपासला.

अर्थात हा मार्ग मोठे कठीण होता. तीव्र संघर्षाचा होता. पण आपल्या कार्यनिष्ठेने दादासाहेबांनी त्यातूनही यशस्वीपणे मार्ग काढत संस्थेची प्रगती साधली.

दादांनी जे ज्ञानदानाचे आणि वसतिगृहाचे कार्य आमरण केले ते राष्ट्रीय पुनरुत्थानाचेच एक अंग होते. दादांच्या समर्पित व्यक्तिमत्त्वामुळे आणि त्यांना लाभलेल्या शिक्षणमहर्षी डॉ. खैर, काकासाहेब देवधर, मामासाहेब दाते, तात्यासाहेब वैद्य, मामासाहेब पेंडसे आणि बाबासाहेब गांगल आदी सहकाऱ्यांमुळे विलक्षण प्रतिकूल परिस्थितीत अनेक प्रकारच्या संकटांशी युक्तीने सामना करीत, संस्था आपली पाळमुळं घट्ट रोवून उभी राहिली आणि स्थिरावली सुध्दा.

त्याकाळी शिक्षणसंस्था या प्रामुख्याने मोठ्या शहरांमध्येच होत्या. त्यामुळे लहानसहान गावात राहणाऱ्या हुशार, होतकरू मुलांची ज्ञानार्जनाबाबत मोठी कुचंबणा होत असे. कारण एकवेळ शिक्षणाचा खर्च परवडला तरी, शहरात राहण्यासाठीच्या जागेची सोय आणि त्याचबरोबर इतर खर्चाचे कसे जमवायचे हा त्यांच्यापुढला यक्षप्रश्न असे. पण पुणे विद्यार्थी गृहाच्या वसतिगृही शाळेमुळे समाजातील सर्व स्तरातल्या विद्यार्थ्यांची मोठी सोय झाली. त्यामुळे उपलब्ध संधीचा फायदा घेत अनेक होतकरू विद्यार्थ्यांचे आयुष्य संस्थेमुळे घडले.

मानवी जीवनाला नैतिकतेचे अधिष्ठान पाहिजे. व्यक्तिगत आणि सामाजिक नैतिकता जर, समाजजीवनातून हद्दपार होऊ लागली तर, तो समाज हा रसातळालाच जातो आणि पर्यायाने मनुष्य जीवन आणि मानवतेचा ऱ्हास होतो. म्हणूनच आपल्या छात्रालयातील आणि शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये नैतिकता रुजवण्यासाठी दादांनी पराकाष्ठेचे प्रयत्न केले. 'आधी केले, मग सांगितले' या उक्तीप्रमाणे आपल्या व्यक्तिगत आणि सार्वजनिक जीवनात दादांनी नैतिकतेचे काटेकोर पालन केले. आपल्या विद्यार्थ्यांचे शील घडवण्याकडेही दादांचा प्रयत्न होता. त्यासाठी कर्तव्यदक्षता, नियमितपणा, अभ्यासाबद्दलची रुचि व त्याबद्दलची नियमितता, व्यवस्थितपणा, सेवा, सत्यवर्तन,

अवांतर वाचन आणि चिंतन हे आठ गुण दादांनी विद्यार्थ्यांच्या अंगी बाणावेत या दृष्टीने शाळेचे धोरण आखले होते. शिक्षण ही एक जन्मसाधना आहे असे दादांचे मत होते. ती साधना व्रतस्थ जीवनाचे नियम पाळूनच करावी याबाबत ते आग्रही होते.

पाठ्यपुस्तकी शिक्षणाबरोबरच मुलांना व्यवसाय शिक्षणही मिळाले पाहिजे हा दादांचा दृष्टिकोन असल्याने, त्यांनी लोकसंग्रह छापखाना संस्थेत सुरू केला. तसेच आपल्या विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक प्रशिक्षणाचीही सोय केली.

संस्था संवर्धन करताना काळाची पावले ओळखणे अतिशय आवश्यक असते. शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार अधिक जोमाने करावयाचा असेल तर, संस्थेचा विस्तार होणे आवश्यक असते. भावी काळात संस्था विस्तारास आणि संस्था वास्तू उभारणीस संस्थेच्या मालकीची स्वतःची जमीन महत्त्वाची भूमिका बजावते, हे व्यावहारिक सत्य दादांनी जाणले आणि पुण्यातच इचलकरंजीचे सरदार घोरपडे यांच्याकडून त्यांची पुण्यातली घोरपडे बाग दादांनी विकत घेतली. त्या विस्तीर्ण जागेत आज अभियांत्रिकी महाविद्यालय, विज्ञान महाविद्यालय तसेच शाळा आदी शैक्षणिक सुविधांच्या इमारती डौलदारपणे उभ्या आहेतच, पण त्याचबरोबर समाजातील वृध्दांसाठी तेथे शतायुभवनही उभारण्यात आले आहे. हा सर्व संस्था विस्तार दादांच्या दूरदृष्टीमुळे सहज शक्य झाला.

एवढेच नव्हे तर, म्हसरूळ, नाशिकलाही दादांनी त्याकाळात संस्थेसाठी बरीच मोठी जागा विकत घेतली. या दोन्ही जागा विकत घेताना दादांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी स्वतः पदरमोडही केली होती. म्हणूनच दादांच्या काळात शिकणारे विद्यार्थी मोठ्या अभिमानाने म्हणतात, पुणे अनाथ विद्यार्थी गृहात राहणारे आम्ही विद्यार्थी अनाथही नव्हतो आणि गरीबही नव्हतो. तर, दादा आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या सजग मायेमुळे आणि संस्कारांमुळे आम्ही श्रीमंतच होतो. दादांच्या यशस्वीततेची त्यांना विद्यार्थ्यांकडून लाभलेली ही एक मोठी पोचपावतीच आहे.

कावळा चिमणीसारखे जीवही काडी काडी जोडून घरटे करतात. पिलांना जन्म देतात आणि जीवन मार्गक्रमणा करतात पण आपण मनुष्य आहोत. आपल्याला परमेश्वराकडून विचारशक्तीचे व त्याच्या सुयोग्य अभिव्यक्तीचे आणि तसेच भावना व्यक्त करण्यासाठी भाषेसारखे साधन प्राप्त झाले आहे. त्याच्या योग्य त्या वापराने प्रत्येकाने निरपेक्ष बुध्दीने आत्महित साधले पाहिजे. या वैचारिक मुशीतून घडलेल्या दादांनी आपले जीवन सर्वस्व संस्थेसाठी आणि संस्थेच्या हितासाठी वेचले.

अर्थात या त्यांच्या कार्यात वहिनींचीही मोलाची साथ त्यांना मिळाली. संस्थेच्या उभारणीत दादांचा त्याग जितका मोलाचा आहे तितकाच, त्या माऊलीचा मूक त्यागही महत्त्वाचा आहे.

दादांची कामगिरी, संस्थेचा व्याप, संस्थेत तयार होऊन संपूर्ण विश्वात कार्यरत असणारे आणि आपल्या कार्यनिष्ठेने जीवनाला सामोरे जाणारे तसेच, स्वदेशाच्या उन्नतीसाठी झटणारे कर्मवीर पाहिले म्हणजे दादांच्या कार्याची झलक जाणवते. दादांच्या कार्याचा आवाका व त्यांचे निष्ठामय जीवन पाहून दादांना शतशत नमन करावेसे वाटते. संस्थाकार्याचे 'हे सतीचे वाण' जोपासण्याचे बळ आम्हाला मिळावे हीच त्यांच्या चरणी प्रार्थना.

अमरत्व म्हणजे केवळ चिरंजीव होणे नसते तर, 'ज्यांच्या जीवनाला आपण स्पर्श केला त्यांच्या स्मृतीत सदैव राहणे' या निकषावर दादा निश्चितच 'काळाच्या माथा पाय' देऊन अमर आहेत.



दि. २९ ऑक्टोबर २०२४
धनत्रयोदशी



# कुलगुरू कै. विष्णु गंगाधर तथा दादासाहेब केतकर ७४ वा स्मृतिदिन

कोषाध्यक्ष – श्री. कृष्णाजी कुलकर्णी

संस्थेच्या दरवर्षीच्या प्रथेप्रमाणे मंगळवार दि. ८ ऑक्टोबर २०२४, अश्विन शुध्द ६ या दिवशी तिथीप्रमाणे संस्थेचे कुलगुरू कै. विष्णु गंगाधर तथा दादासाहेब केतकर यांच्या स्मृतिदिनी कै. दादांच्या मुख्यालयातील पुतळ्यास उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे आणि संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

बुधवार दि. १६ ऑक्टोबर २०२४ रोजी कै. दादांच्या तारखेनुसार स्मृतिदिनानिमित्त मुख्यालयातील पुतळ्यास संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे आणि कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांचे शुभहस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

दि. १६ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी ४.०० वाजता संस्थेच्या विद्यानगरी पर्वती आवारातील कुलगुरू कै. दादासाहेब केतकर सभागृहात कै. दादासाहेब केतकर यांच्या ७४ व्या स्मृतिदिनानिमित्त दै. सकाळचे संपादक श्री. सम्राट अविनाश फडणीस यांचे 'माध्यमांचे सामाजिक भान' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरूवात स्वागत गीताने करण्यात आली. संस्थेच्या मुक्तांगण इंग्शिल स्कूल, पर्वती, पुणे येथील विद्यार्थिनींनी 'पुण्यनगरीचे विद्यार्थी गृह - शताब्दीचा सन्मान' हे गौरवगान सादर केले. हे गौरव गान संस्थेच्या शताब्दी महोत्सवी वर्षानिमित्त (सन २००९) ज्येष्ठ गीतकार श्री. जगदीश खेबुडकर यांनी रचनाबध्द करून त्यास प्रसिध्द गीतकार श्री. प्रभाकर जोग यांनी स्वरबध्द केले होते. गौरवगीत सादर केलेल्या मुक्तांगण इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थिनींना संस्थेतर्फे स्कूल बॅग बक्षीस देण्यात आली.

संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी प्रास्ताविक करताना पाहुण्यांचे आणि उपस्थितांचे स्वागत करून कुलगुरू कै. वि. गं. तथा दादासाहेब केतकर यांच्या जीवनाविषयी व कार्याविषयी माहिती दिली. कै. दादांच्या अनेक आठवणी सांगून, कृतज्ञता व्यक्त करून कै. दादांना विनम्र अभिवादन केले. संस्था उभारताना कामाचा ध्यास आणि संस्थेबद्दलची आस असणारी माणसं संस्थेस मिळाली की चिरस्थायीपण येते, संस्था नावारूपाला येते, असे ते म्हणाले.

संस्था उभारत असताना कठोर वास्तवाचे चटके हसतमुखाने सहन करत कसं जगावं आणि सचोटीच्या मार्गाने आपली प्रगती कशी करावी याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे आपले दादा. राष्ट्रीय शिक्षण व स्वदेशीचा वापर यासाठी दादांनी पुढाकार घेतला. 'देश हा देव असे माझा' अशी दृढ श्रध्दा दादांची होती. मला देशसेवा करायची आहे, कुटुंबाने माझ्याकडून कोणत्याही अपेक्षा ठेवू नये असे दादांनी कुटुंबातील सदस्यांना सांगितले. संस्थेसाठी आपण आहोत, आपल्यासाठी संस्था नाही हे दादांचे तत्त्वज्ञान होते. जमा होणाऱ्या वर्गणीतून विद्यार्थ्यांची व्यवस्था होत नाही, खर्च जास्त आणि उत्पन्न कमी आहे. अशा परिस्थितीत दादांनी स्वतः विद्यार्थ्यांबरोबर माधुकरीचा मार्ग अवलंबला. उपलब्ध वस्तू अल्प प्रमाणात सुध्दा वाया घालवू नये असे दादांचे स्पष्ट मत होते. दादा संस्थेच्या आवारातील सोनचाफ्याची फुले रुग्णालयातील रुग्णांना पाठवित असत. आवारातील जांभळाच्या झाडांची जांभळे दादा मधुमेही वर्गणीदारांकडे पाठवत असत. दादांनी समाजासाठी ग्रंथालय सुरू केले. अशी दादांच्या कार्याची सविस्तर माहिती त्यांनी दिली.

मुक्तांगण इंग्शिल स्कूलच्या शिक्षिका कु. मोहना नातू यांनी प्रमख पाहुणे श्री. सम्राट अविनाश फडणीस यांचा परिचय करून देताना त्यांच्या पत्रकारीतेतील कारकिर्दीविषयी व त्यांच्या पाणी, पर्यावरण, समाज, राजकारण अशा अनेक विषयांवर केलेल्या सखोल अभ्यासाची आणि देश - परदेशातील परिषदांमधील त्यांचा सहभाग या विषयीचीही माहिती दिली. त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आलेले आहे.

कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते प्रमुख पाहुणे श्री. सम्राट अविनाश फडणीस यांना शाल, पुष्पगुच्छ, स्मृतिचिन्ह व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

संस्थेच्या अभियांत्रिकी महाविद्यालय वसतिगृह या विभागातील लेखनिक सौ. गायत्री गिरीष जोशी यांचा सेवानिवृत्तीनिमित्त शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

प्रमुख पाहुणे श्री. सम्राट अविनाश फडणीस यांनी माध्यमांचे सामाजिक भान या विषयावर बोलताना दै. सकाळचे संस्थापक आणि संस्थेचे माजी विद्यार्थी कै. नानासाहेब परूळेकर यांच्यापासून आजतागायत संस्थेशी असलेल्या आपल्या ऋणानुबंधाविषयी माहिती दिली. पुणे विद्यार्थी गृहाने स्वांतत्र्यपूर्व काळापासून मुद्रण क्षेत्रासाठी केलेल्या कार्याचाही कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला. पुणे विद्यार्थी गृहाने स्वतःच्या मुद्रणालयात अनेक मुद्रीकांचा (फॉन्ट) छपाई करण्यासाठी शोध लावल्याचे आवर्जून नमूद केले.

वर्तमानपत्रांची माहिती करून देताना जगामध्ये पहिल्यांदा सन १६०५ मध्ये पहिले वर्तमानपत्र प्रसिध्द झाल्यानंतर १७५ वर्षांनी भारतामध्ये सन १७८० मध्ये पहिले वर्तमानपत्र व सन १८३२ मध्ये पहिले मराठी वर्तमानपत्र प्रसिध्द झाल्याची माहिती दिली. तसेच आकाशवाणी, दूरदर्शन, इंटरनेट, मोबाईल फोन यांची आपल्या आयुष्यातील आगमनाची गती संथ होती. पण गेल्या १५ वर्षांमध्ये सोशल मिडिया म्हणजेच व्हॉट्सॲप, फेसबुक, युट्युब, इंस्टाग्राम अशा अनेक गोष्टीचा आपल्या जीवनावर झालेला प्रभाव या विषयी माहिती दिली. डिजिटल माध्यमांच्या गतीमुळे तरुण पिढीला माध्यमांचा वापर नेमका कसा, किती व केव्हा करायचा हेच कळेनासे झाले आहे. तरुण मुलांची लक्षपूर्वक ऐकण्याची क्षमता (अटेन्शन स्पॅन) फक्त ७ सेकंद झाल्याची माहिती दिली. डिजिटल माध्यमांच्या अतिवापरचा दुष्परिणाम तरुण पिढीच्या बौध्दिक क्षमता व सामाजिक आकलन शक्तीवर होत असल्यामुळे चिंता व्यक्त केली. प्रिंट मिडिया दिवसेंदिवस कमी होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

पूर्वी वर्तमानपत्रांचे मर्यादित असलेले माध्यम आता झपाट्याने बदलत आहे. समाज माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या माहितीचा वेग प्रचंड आहे. अशा परिस्थितीमध्ये कुठल्याही प्रकारच्या माहितीची खातरजमा करणे आवश्यक आहे. समाजभान जपण्यासाठी माध्यमांची साक्षरता वाढवण्याची गरज असल्याचे आवर्जून नमूद केले

संस्थेचे कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी प्रमुख पाहुणे श्री. सम्राट फडणीस आणि उपस्थितांचे आभार मानले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सूत्रसंचालन करणाऱ्या सौ. माणिक जोशी, आणि पाहुण्यांचा परिचय करून देणाऱ्या कु. मोहना नातू यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रम प्रसंगी संस्था पदाधिकारी, संचालक, देणगीदार, हितचिंतक, माजी विद्यार्थी, विविध विभागांचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, सेवक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुक्तांगण इंग्शिल स्कूलच्या शिक्षिका सौ. माणिक जोशी यांनी केले. कु. मोहना नातू यांनी गायलेल्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. या प्रसंगी सर्व उपस्थितांसाठी कोजागिरी पौर्णिमेनिमित्त दुग्धपानाचे आयोजन करण्यात आले होते. ***

## शिशुनिकेतन मराठी माध्यम, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र संपत कांबळे**
**प्र. मुख्याध्यापिका : सौ. अरुणा कांबळे**

**''गोरा गोरा पान,
छोटा छोटा छान
सुपाऐवढे कान
हा दिसतो किती छान''**

भाद्रपद महिना उजाडताच चाहूल लागते बाप्पाच्या आगमनाची. शाळेत गणपती बाप्पाच्या आगमनाची जोरात तयारी चालू झाली होती.

मंगळवार दि. ३ ऑगस्ट २०२४ रोजी शाळेमध्ये शाडू मातीची श्री गणेश मूर्ती बनविण्याची कार्यशाळा दुपारी ३ ते ५ या वेळेत घेण्यात आली. इ. २ री च्या वर्गशिक्षिका सौ. राधिका दगडे यांनी विद्यार्थ्यांना श्री गणेश मूर्ती बनविण्याबाबत मार्गदर्शन केले. सौ. राधिका दगडे यांनी ३ दिवस आधीच शाडू माती भिजवून ठेवली होती. त्यांनी श्री गणेशाची सुबक मूर्ती बनविण्याचे प्रात्यक्षिक दाखवले. बालवाडी ते इ. ४ थी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांचे छोटे - छोटे हात मूर्ती बनविण्यात मग्न झाले होते. प्रत्येक जण आपल्या कल्पनेतील बाप्पाला मूर्त स्वरूप देण्याचा प्रयत्न करत होते. संचालक डॉ. राजेंद्र कांबळे यांनी या कार्यशाळेला भेट देऊन सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

श्री गणेश हे ६४ कलेची देवता आहे. श्री गणेशाच्याकृपेने मूर्ती कलेची विद्यार्थ्यांना ओळख झाली.

**गणेशोत्सव**

शनिवार दि. ७ सप्टेंबर २०२४ रोजी संस्थेच्या धर्नुधारी श्रीराम श्री गणेशाची स्थापना करण्यात आली होती. गणेशोत्सवानिमित्त रोज आरती गायन, गणेशस्तोत्राचे पठण करण्यात येत होते. श्री गणेशाची गीते सादर करण्यात आली.

सोमवार दि. ९ सप्टेंबर २०२४ रोजी डॉ. मधुसूदन घाणेकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विद्यार्थ्यांसमोर गणपती बाप्पाच्या छान - छान कविता सादर केल्या. शनिवार दि. १४.९.२०२४ रोजी गणपती चित्र रंगभरण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी यामध्ये उसस्फूर्त सहभाग घेऊन चित्रे छान रंगवली.

***

**✻ शिशुनिकेतन मराठी माध्यम, पुणे ३० ✻**



**शाडू मातीची श्री गणेश मूर्ती बनविण्याची कार्यशाळा घेताना इ. २ री च्या वर्गशिक्षिका सौ. राधिका दगडे, समवेत मुख्याध्यापिका सौ. अरुणा कांबळे आदी मान्यवर** ↑

**शाडू मातीच्या श्री गणेश मूर्ती बनविताना विद्यार्थी**



## महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्था, पुणे

**कार्यवाह : डॉ. राजेंद्र संपत कांबळे**
**प्र. प्राचार्य : प्रा. पी. व्ही. शिंदे**

### अतिथी व्याख्यान

दि. ७ ऑगस्ट २०२४ रोजी श्री. केतन दास, 'श्री एम इंडिया' यांचे 'करिअर ऑपॉर्च्युनिटी इन वाइड फॉर्मेट प्रिंट टेक्नॉलॉजी युजिंग इंकजेट' या संदर्भात अतिथी व्याख्यान आयोजन करण्यात आले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना 'डिजिटल प्रिंटिंग' या क्षेत्रातील विविध उपलब्ध संधी, तंत्रज्ञान याबद्दल माहिती दिली.

### इंडक्शन प्रोग्रॅम

दि. २ सप्टेंबर २०२४ रोजी प्रथम वर्षातील नव्याने प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी 'इंडक्शन प्रोग्राम' चे आयोजन करण्यात आले होते. प्र. प्राचार्य श्री. पी. व्ही. शिंदे यांनी उपस्थित पालक व विद्यार्थ्यांना संस्थेविषयी तसेच वर्षभरात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाविषयी माहिती दिली. याप्रसंगी संस्थेचे माजी विद्यार्थी श्री. पवन खके प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना करिअर विषयी मार्गदर्शन केले. श्री. पवन खके, अमेरिकेमधून एम. एस. करून नुकतेच भारतात परत आले असून युनिक लेबल्समध्ये व्यवस्थापक न्यू प्रॉडक्ट डेव्हलपमेंट म्हणून काम करत आहेत. प्राध्यापक श्री. अक्षय रावेतकर यांनी श्री. पवन खके यांचा परिचय करून दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक श्री. शंकर शेळकंदे यांनी केले.

### शिक्षक दिन

दि. ५ सप्टेंबर २०२४ रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात आला. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांविषयी भावना व्यक्त केल्या तसेच शिक्षक दिनाचे महत्त्व सांगितले. प्राध्यापक कु. जान्हवी प्रभुणे यांनी विद्यार्थ्यांना आपल्या आयुष्यातील गुरूंचे स्थान या विषयी माहिती सांगितली. प्र. प्राचार्य श्री. पी. व्ही. शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले

### औद्योगिक भेट

दि. २५ सप्टेंबर २०२४ रोजी अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांची 'प्रथम टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड', नसरापूर, पुणे येथे औद्योगिक भेट आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांना मशिन उत्पादनाविषयी तसेच मशिन मेंटेनन्स विषयी सखोल माहिती मिळाली. प्र. प्राचार्य श्री. पी. व्ही. शिंदे, प्रा. श्री. शंकर शेळकंदे, प्राध्यापक श्री. रोशन चौधरी यांनी सदर भेटीचे संयोजन केले.

***

## महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**
**प्राचार्य : श्री. व्हि. पी. गावडे**

### अभिनंदनीय

शनिवार दि. १४ सप्टेंबर २०२४ रोजी विद्यालयातील सहाय्यक शिक्षक डॉ. ज्ञानेश्वर दाते यांना महाराष्ट्र राज्य लोकशाही आघाडी (टीडीएफ) यांचेतर्फे 'आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

**डॉ. ज्ञानेश्वर दाते यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

### हस्ताक्षर वर्ग

शनिवार दि. ५ ऑक्टोबर २०२४ रोजी सन १९९०-९१ चे माजी विद्यार्थी श्री. माणिक पासलकर यांचा हस्ताक्षर वर्ग इ. ५वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला होता. मराठी भाषेतील वर्णाक्षरे सुंदर कशी काढावीत, वळणदार व सुंदर हस्ताक्षर कसे काढावे याचे उत्कृष्ट मार्गदर्शन केले. या प्रसंगी सर्व विद्यार्थी आणि शिक्षक उपस्थित होते.

***

# मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

**संचालक : श्री. आनंद कुलकर्णी**
**उपकार्याध्यक्ष : श्री. एस. एम. जिर्गे**
**प्राचार्या : सौ. सुप्रिया देशकुलकर्णी**
**हेडमिस्ट्रेस : सौ. रेखा बाली**

## पूर्व प्राथमिक विभाग

### ओपन डे

शनिवार दि. ३१ ऑगस्ट २०२४ रोजी ओपन डे घेण्यात आला. पालकांना घटक चाचणीच्या उत्तर पत्रिका देण्यात आल्या. शिक्षकांनी प्रथम सत्र परीक्षेच्या अभ्यासाबाबत पालकांना मार्गदर्शन केले.

### स्पोर्ट्स हॉल उपक्रम

शुक्रवार दि. ६ सप्टेंबर २०२४ रोजी स्पोर्ट्स हॉलमध्ये नव्याने बसवलेल्या पडद्यावर सर्व गटातील विद्यार्थ्यांना 'छोटा भीम' हे कार्टून दाखविण्यात आले. मोठ्या पडद्यावर हे कार्टून पाहताना विद्यार्थ्यांना खूप मजा आली.

### गणेश चतुर्थी

सोमवार दि. ९ सप्टेंबर २०२४ रोजी गणेश चतुर्थी निमित्त टॉयरुममध्ये श्री गणेशाची स्थापना करण्यात आली. गणेशोत्सवानिमित्त सुदंर आरास करण्यात आली होती. प्र. मुख्याध्यापिका सौ. रेखा बाली यांनी श्री गणेशाचे पूजन केले. सर्व विद्यार्थ्यांनी श्री गणेशाची आरती म्हटली.

सर्व शिशु व छोट्या गटातील विद्यार्थ्यांनी पुस्तकामधील श्री गणेशाचे चित्र सुंदर रितीने रंगविले. मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी गणपतीचे चित्र रंगवून टिश्युपेपरच्या ठशाच्या सहाय्याने ते सजविले.

## प्राथमिक विभाग

### मराठी हस्ताक्षर स्पर्धा

मंगळवार दि. २० ऑगस्ट २०२४ इ. १ ते इ. ६ वी च्या विद्यार्थ्यांसाठी मराठी हस्ताक्षर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे इयत्तेनुसार परीक्षक म्हणून पुढील शिक्षिकांनी काम पाहिले.

| इयत्ता | परीक्षकाचे नाव |
|---|---|
| इ. १ ली | सौ. रश्मी देव |
| इ. २ री | सौ. सोनल काणे |
| इ. ३ री | सौ. मीनल गद्रे |
| इ. ४ थी | सौ. प्रिया चिटणीस |
| इ. ५ वी | सौ. राणी चांदोरकर |
| इ. ६ वी | सौ. स्नेहा देसाई |

मराठी हस्ताक्षर स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे

| विद्यार्थ्याचे नाव | इ / तु | क्रमांक |
|---|---|---|
| कु. विघ्नेश सावंत | १ ली ड | प्रथम |
| कु. लावण्या साळवे | १ ली इ | द्वितीय |
| कु. मुद्रा पाठक | १ ली ड | तृतीय |
| कु. चिन्मय चव्हाण | २ री अ | प्रथम |
| कु. समर्थ सोहणी | २ री इ | द्वितीय |
| कु. शौर्य खंडागळे | २ री क | तृतीय |
| कु. आराध्य मांडे | ३ री क | प्रथम |
| कु. मनस्विनी महाजन | ३ री क | द्वितीय |
| कु. स्वरा वैचल | ३ री क | तृतीय |
| कु. समिक्षा सुरवसे | ४ थी इ | प्रथम |
| कु. श्लोक मरळ | ४ थी क | द्वितीय |
| कु. अन्वी कांगणे | ४ थी ब | तृतीय |
| कु. आर्या माने | ५ वी ड | प्रथम |
| कु. शर्वरी जाधव | ५ वी ब | द्वितीय |
| कु. शुभ्रा गायकवाड | ५ वी ब | तृतीय |
| कु. आराध्या काटकर | ६ वी क | प्रथम |
| कु. प्रांजल साळेकर | ६ वी इ | द्वितीय |
| कु. सिया राठी | ६ वी ड | तृतीय |

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या मार्गदर्शक विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन**

### ओपन डायस

दि. ३१ ऑगस्ट २०२४ रोजी इ. १ ली ते ६ वी च्या विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण, गोपाळकाला, दहीहंडी या विषयावरील चित्रे रंगविली. तसेच इ. ३ ते इ. ६ वी च्या विद्यार्थ्यांनी गोष्टी सांगितल्या.

### शिक्षक दिन

दि. ५ सप्टेंबर २०२४ रोजी शिक्षकदिनानिमित्त प्राथमिक विभागात इ. ६ वी ड मधील कु. स्वरा पवार व इ. ६ वी इ मधील अपर्णा शिंदे यांनी शिक्षक दिनाबद्दल माहिती सांगितली.

### इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा

दि. २१ सप्टेंबर २०२४ रोजी इ. १ ली ते ६ वी च्या विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धा दोन फेऱ्यांमध्ये घेण्यात आली. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

### कळी उमलताना या कार्यक्रमाचे आयोजन

दि. १३ सप्टेंबर २०२४ रोजी इ. ६ वी च्या विद्यार्थिनींसाठी रोटरी क्लब मार्फत 'कळी उमलताना' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमास प्रमुख वक्त्या डॉ. तनुजा जावडेकर यांनी विद्यार्थिनींना स्वच्छता, पोषक आहार, विशिष्ट काळात घेण्यात येणाऱ्या काळजीविषयी मार्गदर्शन केले. काही महत्त्वाची माहिती पीपीटी मार्फत देण्यात आली.

या कार्यक्रमास प्र. मुख्याध्यापिका सौ. रेखा बाली, शिक्षिका प्रतिनिधी सौ. वैशाली डबीर, डॉ. मीनल धोत्रे, (प्रेसिन्डेट गांधी भवन, रोटरी क्लब), प्रा. पद्मजा जोशी (पुणे विद्यार्थी गृहाचे अभियांत्रिकी महाविद्यालय), सौ. हर्षा माने (सदस्य, रोटरी क्लब), सौ. मिनाक्षी माळी (सदस्य, रोटरी क्लब) उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माध्यमिक विभागाच्या समुपदेशिका सौ. सावनी ओक यांनी केले.

## माध्यमिक विभाग

### शालेय स्तर प्रश्नमंजुषा स्पर्धा

दि. २२ ऑगस्ट २०२४ रोजी इ. ७ वी ते इ. १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत बोस, विवेकानंद, टिळक आणि टागोर हाऊसच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. टागोर हाऊसच्या विद्यार्थ्यांनी स्पर्धा जिंकली. विवेकानंद आणि टिळक हाऊसच्या विद्यार्थ्यांना द्वितीय क्रमांक विभागून देण्यात आला. बोस हाऊसच्या विद्यार्थ्यांनी तृतीय क्रमांक मिळविला. या स्पर्धेचे कामकाज शिक्षिका सौ. प्राची कोल्हटकर आणि सौ. याज्ञी आडकर यांनी पाहिले.

दि. २३ ऑगस्ट २०२४ रोजी इ. ७ वी ते इ. १० वी च्या सर्व विद्यार्थ्यांसाठी टेकफेस्ट ऑलिंपियाड या परीक्षेची प्रथम फेरी घेण्यात आली.

### ओपन डे

दि. २४ ऑगस्ट २०२४ रोजी इ. ७ वी ते इ. १० वी च्या विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना पहिल्या घटक चाचणी परीक्षेच्या सर्व विषयांच्या उत्तरपत्रिका दाखविण्यात आल्या आणि त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले.

### ओपन डायस कार्यक्रम

दि. २९ ऑगस्ट २०२४ रोजी इ. ९ वी आणि १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी ओपन डायस कार्यक्रम आजोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी आषाढी वारी, गुरूपौर्णिमा आणि पर्यावरण दिवस या विषयांवर सुंदर भाषणे, बहारदार नृत्ये आणि पियानो वादन यांचे सादरीकरण केले.

### संस्कृत बातमी वाचन स्पर्धा

दि. ३० ऑगस्ट २०२४ रोजी इ. ८ वी ते इ. १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी संस्कृत बातमी वाचन स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे

| विद्यार्थ्यांचे नाव | इ तु | क्रमांक |
|---|---|---|
| कु. रुची जोशी | ९ वी अ | प्रथम |
| कु. अभिराज सोनावणे | १० वी अ | द्वितीय |
| कु. नंदिनी सागडे | ८ वी ब | द्वितीय |
| कु. रोमा मेंडेरनी | ९ वी ब | तृतीय |

या स्पर्धेसाठी उच्च माध्यमिक विभागातील शिक्षिका सौ. मंजिरी पाटणकर आणि शिक्षिका कु. अनुपमा कर्वे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

दि. ३१ ऑगस्ट २०२४ रोजी शाळेत इंटरॅक्ट क्लबचा उद्‌घाटन सोहळा पार पडला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अजय काळे उपस्थित होते. श्री. आरोह दिनकर यांनी ''कृत्रिम बुद्धिमत्ता : भविष्यातील एक झलक'' या विषयावर विद्यार्थ्यांना संबोधित केले. तसेच क्लबमध्ये होणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली.

**शिक्षक दिन**

दि. ५ सप्टेंबर २०२४ रोजी शिक्षकदिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी इ. १० वी च्या विद्यार्थ्यांनी शिक्षक बनून विद्यार्थ्यांना शिकवले.

**शैक्षणिक क्षेत्र भेट**

दि. १४ सप्टेंबर २०२४ रोजी हिंदी दिवस साजरा करण्यात आला. यावेळी प्रार्थना, प्रतिज्ञा, स्वच्छतेची प्रतिज्ञा व इतर कामकाज हिंदी भाषेत करण्यात आले. विद्यार्थ्यांनी संत मीराबाई यांची पदे आणि संत कबीर यांचे दोहे गायले.

**शैक्षणिक सहल**

दि. १४ सप्टेंबर २०२४ रोजी इ. ८ वी ड आणि इ तुकडीच्या विद्यार्थ्यांसाठी 'इतिहास पुरातत्व भाषाशास्त्र आणि संस्कृत' या क्षेत्रातील अग्रगण्य संस्था असलेल्या डेक्कन महाविद्यालय येथे शैक्षणिक क्षेत्र सहलीचे आयोजन करण्यात आले होते.

**महावाचन अभियान**

दि. ३ सप्टेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र सरकारतर्फे घेण्यात आलेल्या महावाचन अभियानातंर्गत इ. ७ वी ते इ. १० वी च्या सर्व विद्यार्थ्यांनी इंग्लिश, हिंदी, मराठी, संस्कृत, जर्मन या विषयांच्या साहित्याची वेगवेगळी पुस्तके वाचली.

**विशेष व्याख्यानास उपस्थिती**

दि. १४ सप्टेंबर २०२४ रोजी आयुका पुणे येथे डॉ. अजिदेब चॅटर्जी यांचे ''पहिल्या ताऱ्याचा वैश्विक पहाट जन्म'' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानाला इ. ९ वी ते ॲस्ट्रॅनॉमी क्लबचे ७ विद्यार्थी आणि शिक्षिका सौ. सुजाता मोरे उपस्थित होते.

**स्मार्ट गर्ल्स कार्यशाळेचे आयोजन**

दि. ५ सप्टेंबर २०२४ रोजी स्मार्ट गर्ल्स कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. इ. ७ वी व इ. ८ वी मधील ३२२ विद्यार्थिनींना या कार्यशाळेमध्ये सहभाग घेतला. या कार्यशाळेअंतर्गत विद्यार्थिनींसाठी स्वसंरक्षण, आत्मसंरक्षण तसेच मोह, प्रलोभने, मासिक पाळी व स्वच्छता इ. विषयांवर चर्चासत्रे घेण्यात आली. मुलींमध्ये संवाद जागवणे आणि सुसंवाद वाढवणे, वर्गातील मित्र - मैत्रिणींबरोबर आपली मैत्री कशी असावी याबद्दल अधिक माहिती देण्यात आली. यासाठी कु. समृध्दी आणि कु. तन्वी सराफ यांनी निःशस्त्र असताना तसेच लाठीकाठी वापरून आपण कसे स्वसंरक्षण करु शकतो यासाठीच्या प्रशिक्षणाची माहिती व प्रात्यक्षिके सादर केली. या कार्यशाळेचे आयोजन प्र. प्राचार्या सौ. मीना राणे, पर्यवेक्षिका सौ. सुप्रिया देशकुलकर्णी, सौ. जयती नरवणे यांनी केले. या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी शिक्षिका सौ. श्रध्दा लाळे, सौ. तन्मया सहस्त्रबुध्दे व सौ. तृप्ती मुळे यांचे सहाय्य लाभले.

## उच्च माध्यमिक विभाग

**समुपदेशन व्याख्यान**

दि. २९ ऑगस्ट २०२४ रोजी इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

विद्यालयाच्या समुपदेशक सौ. सावनी ओक यांनी याबाबत मार्गदर्शन करताना रागावरील नियंत्रण तसेच विद्यार्थ्यांची वर्तणूक कशी असावी, विद्यार्थ्यांनी वेळेचे व्यवस्थापन कसे करावे या विषयावर मार्गदर्शन केले.

## अभिनंदनीय

भारतीय नौदलाने आयोजित केलेल्या प्रश्नमंजुषेत इ. ११ वी च्या विद्यार्थ्यांनी प्रथम फेरीमध्ये सहभाग नोंदवला होता. या फेरीत यशस्वी होऊन त्यांची दुसऱ्या फेरीसाठी निवड झाली. सहभागी विद्यार्थी पुढील प्रमाणे

| विद्यार्थ्याचे नाव | इ / तु |
|---|---|
| कु. वंशिका राकेशकुमार गुप्ता | ११ वी ड |
| कु. प्रज्ञा संतोष अडसुले | ११ वी ड |
| कु. तेजस्विनी महिंद्र चोरघे | ११ वी ब |

***

## ✻ मुक्तांगण इंग्लिश स्कुल व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ९ ✻



दि. २९ ऑगस्ट २०२४ रोजी इ. ९ वी आणि १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित 'ओपन डायस' कार्यक्रमामध्ये सुंदर भाषणे आणि बहारदार नृत्ये सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांसमवेत पर्यवेक्षिका सौ. जयती नरवणे आणि शिक्षिका



दि ३१ ऑगस्ट २०२४ रोजी शाळेत 'इंटरॅक्ट क्लब' च्या उद्घाटन प्रसंगी उपस्थित प्रमुख पाहुणे डॉ. अजय काळे, वक्ते श्री. आरोह दिनकर, शिक्षिका सौ. सुधा कुलकर्णी, सौ. तृप्ती मुळे, सौ. प्रियांका केकाण उपस्थित विद्यार्थी



दि. १४ सप्टेंबर २०२४ रोजी हिंदी दिवस प्रसंगी, हिंदी कविता, संत मीराबाई यांची पदे आणि संत कबीर यांचे दोहे गाणाऱ्या विद्यार्थ्यांसमवेत प्र. प्राचार्या सौ. मीना राणे, पर्यवेक्षिका सौ. सुप्रिया देशकुलकर्णी सौ. जयती नरवणे आणि शिक्षिका

## विद्याभवन–घाटकोपर, मुंबई शाखा

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

### विद्याभवन संकुल

**अभिनंदनीय**

रविवार दि. २२.९.२०२४ रोजी लायन्स क्लब ऑफ घाटकोपरतर्फे प्रतिवर्षी घाटकोपर विभागातून दिला जाणारा, माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षेमध्ये उत्तम निकाल लागणाऱ्या शाळांचा, मुख्याध्यापकांचा, गुणवंत शिक्षकाचां व विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ कम्युनिटी हॉल, गरोडिया नगर, घाटकोपर येथे संपन्न झाला.

विद्याभवन घाटकोपर संकुलातून पुढील मान्यवर शिक्षकांचा सत्कार करण्यात आला :

१. श्रीमती योगिनी पोतदार, मुख्याध्यापिका, विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

२. श्री. सुनिल पाटील, मुख्याध्यापक, विद्याभवन हायस्कूल नं. २

३. श्रीमती ज्योती देसाई, उपमुख्याध्यापिका, विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

४. श्रीमती तनुजा पांडे, सहा. शिक्षिका, विद्याभवन हायस्कूल नं. २

५. श्री. विनोद बिरादर, सहा. शिक्षक, विद्याभवन हायस्कूल नं. २

६. श्रीमती नंदिनी सुरी, सहा. शिक्षिका, विद्याभवन हायस्कूल नं. २

इ. १०वी परीक्षा उत्तीर्ण झालेले गुणवंत विद्यार्थी

१. कु. घंगाळे अदिती देविदास

२. कु. भोर अर्णव प्रविण

३. कु. इंगळे दिशू विजय

४. कु. दातीर अथर्व गोविंद

५. कु. तोत्रे कोमल तुषार

६. कु. नरावडे देवांग अशोक

**सर्व गुणवंत शिक्षक व विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन !**

**ग्रंथ महोत्सव**

'जिथे दिसते पुस्तक, तिथे व्हावे नतमस्तक' या उक्तीनुसार वाचन संस्कृती वृध्दिंगत करण्यासाठी दि. ७ ऑक्टोबर २०२४ रोजी विद्याभवनच्या प्रांगणात ग्रंथ प्रदर्शन मेळावा आयोजित करण्यात आला होता.

महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महावाचन उत्सव २०२४ स्टार्स प्रकल्पांतर्गत, विभागीय शिक्षण कार्यालय बृहन्मुंबई विभाग, मुंबई व शिक्षण निरीक्षक कार्यालय, बृहन्मुंबई उत्तर विभाग, चेंबूर, मुंबई तालुकास्तरीय URC-३ यांनी या मेळाव्याचे आयोजन केले होते.

प्रमुख पाहुणे म्हणून आचार्य मराठे कॉलेजचे माजी उपप्राचार्य श्री. गिरीश जोशी व समुपदेशक 'स्पीक विथ गीतांजली' कंपनीच्या फाउंडर गीतांजली अंबुलकर उपस्थित होत्या. तसेच बृहन्मुंबई उत्तर विभागाचे शिक्षण निरीक्षक डॉ. मुश्ताक शेख, सहा.शिक्षण उपनिरीक्षक श्री. संतोष कंठे, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, शिक्षण उपनिरीक्षक श्रीमती भक्ती गोरे, शिक्षण उपनिरीक्षक श्री. गणेश खाडे, कार्यक्रम अधिकारी श्री. दीपक दिनकर, मुख्य निमंत्रक श्री. भारमळ, डॉ. मोहम्मद खान, डॉ. गीतांजली सालियन, सर्व विषय साधन व्यक्ती, मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार, मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील, उपमुख्याध्यापिका श्रीमती लता नायर व श्रीमती ज्योती देसाई, समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन्, इतर मान्यवर, शिक्षक, पालक व विद्यार्थी कार्यक्रमात सहभागी होते.

बँडच्या पथकात पाहुण्यांचे आगमन झाले. पुस्तक दालनाचे उद्घाटन फीत कापून करण्यात आले. औक्षणानंतर पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन झाल्यानंतर ग्रंथ दिंडीला सुरूवात झाली. अतिशय सुंदर रित्या सजावट केलेल्या पालखीत ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, भगवद्गीता, विश्वकोश, दासबोध, कुलगुरू दादासाहेब केतकर यांचा संस्मरण ग्रंथ अशा ग्रंथांनी पालखी सजली होती. दिंडीमध्ये सर्व मान्यवर, सर्व शाळांचे शिक्षक, विद्यार्थी व पालक सहभागी झाले

होते. दिंडीमध्ये पारंपरिक वेशातील विद्यार्थी, हातात घोषवाक्यांचे फलक घेतलेले विद्यार्थी, संतांच्या पोशाखात आलेले विद्यार्थी व गणवेशातील विद्यार्थी सहभागी झाले होते. बँडचे विद्यार्थी व लेझीमच्या विद्यार्थिनी यांनी दिंडीचे नेतृत्व केले.

विद्यार्थी, शिक्षक, मान्यवर सर्वांनी झिम्मा-फुगड्या घालून या दिंडीची शोभा वाढवली. सर्व मान्यवरांनी पुस्तक दालनाला भेट दिली. यामध्ये अनेक प्रकाशकांनी आपापल्या पुस्तकांचे स्टॉल लावले होते. पुणे विद्यार्थी गृहाचा सुध्दा एक स्टॉल होता. सर्व स्टॉल्स्मध्ये विद्यार्थी उपयोगी उत्तम प्रकारच्या वाङ्मयाचा समावेश होता.

सनराइज हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी ईशस्तवन व ग्रंथगीत, तसेच विद्याभवन च्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय व सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुणे श्री. गिरीश जोशी यांनी वाचन संस्कृती वृध्दिंगत करण्यासाठी काय केले पाहिजे? त्याचे महत्त्व प्रतिपादित केले. श्रीमती गीतांजली यांनी लक्षपूर्वक वाचलेल्याचे परीक्षेमध्ये उपयोजन कसे करावे? ते समजावून सांगितले. श्री. कंठे यांनीही प्रतिकूल परिस्थितीमध्ये आपले शिक्षण कसे पूर्ण करावे? हे सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यानंतर एस्. एस्. मल्टिपर्पज हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर भारूड सादर केले. आभार प्रदर्शनानंतर पसायदानाने प्रथम सत्रातील कार्यक्रमाची सांगता झाली.

या महोत्सवाला साधारण ५० शाळांमधील शिक्षक व २५०० विद्यार्थी यांनी भेट दिली. दुपारी दुसऱ्या सत्रामध्ये जात्यावरील ओव्या व काव्य संमेलनाचा आस्वाद सर्वांनी घेतला. ३० ते ३५ शाळांच्या शिक्षकांनी आपल्या स्वरचित कविता सादर केल्या.

वंदे मातरम् ने कार्यक्रमाची सांगता झाली. दोन्ही सत्रातील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहा. शिक्षिका श्रीमती मीनल भोळे व श्रीमती मीना गायकवाड यांनी केले.

## पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई शाखा

### डॉ. अण्णासाहेब खैर पारितोषिक वितरण समारंभ

शनिवार दि. २१ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता घाटकोपर विद्याभवनच्या प्रांगणात पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभाग आयोजित शिक्षणमहर्षी डॉ. अण्णासाहेब खैर पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे सेवानिवृत्त न्यायमूर्ती एम्. एल्. टहलियानी, मुंबई हायकोर्ट, लोकायुक्त, महाराष्ट्र, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, माजी मंडळाचे अध्यक्ष डॉ. बा. गो. कुलकर्णी, माजी विद्यार्थी महामंडळाचे अध्यक्ष श्री. प्रा. कृ. ना. शिरकांडे, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मंडळाचे कोषाध्यक्ष श्री. प्रकाश सादमे, सचिव टी. आर. दौंडकर, सर्व विभागाचे प्रमुख, शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमापूजन करून झाली. प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी ईशस्तवन व स्वागतगीताने मान्यवरांचे स्वागत केले.

माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष डॉ. बा. गो. कुलकर्णी यांनी प्रास्ताविक सादर करून मंडळाच्या वाटचालीचा आढावा घेतला. मान्यवरांचा शाल, पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. मंडळाचे कोषाध्यक्ष श्री. प्रकाश सादमे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सर्व मान्यवरांच्या सत्कारानंतर कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी संस्थेच्या प्रगतीचा मागोवा घेतला.

न्यायमूर्ती एम्. एल्. टहलियानी यांनी डॉ. अण्णासाहेब खैर यांनी केलेल्या महान कार्याचे महत्त्व विशद केले. संस्थेची आजची प्रगती पाहून संस्थेचे अभिनंदन करुन विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले, मिळालेल्या ज्ञानाचे उपयोजन कसे करावे हे विस्तृतपणे सांगितले. शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचा व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचा पारितोषिके व

प्रशस्तीपत्रके देऊन गौरव करण्यात आला. तसेच दहावी, बारावी व पदवी परीक्षेत यश प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचाही पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला. घवघवीत यश प्राप्त करण्याचे श्रेय जसे विद्यार्थ्यांना जाते, तसेच मुख्याध्यापकांनाही जाते म्हणून प्रशालेच्या मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार व मुख्याध्यापक श्री. सुनिल पाटील यांचा प्रमुख पाहुण्यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री 'माझी शाळा, सुंदर शाळा' या अभियानांतर्गत नवी मुंबई विभागात खाजगी शाळांमधून सर्वोत्कृष्ट शाळा व ठाणे जिल्ह्यातून तृतीय क्रमांकाचे रु. तीन लाखांचे पारितोषिक मिळविणारी शाळा म्हणून विद्याभवन नेरूळचे मुख्याध्यापक श्री. गोरख रामू कदम आणि मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती श्रीजा नायर व मुख्याध्यापिका श्रीमती मनिषा मुळीक यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी सचिव श्री. टी. आर. दौंडकर यांनी आभार प्रदर्शन केले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशालेच्या सहा.शिक्षिका श्रीमती मीनल भोळे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

## विद्याभवन पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी
## विद्याभवन पूर्व प्राथमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**पर्यवेक्षिका : सौ. सिध्दी साळवी (सेमी इंग्रजी),**
**पर्यवेक्षिका : सौ. पूजा फरिया (इंग्रजी माध्यम)**

### दुर्गोत्सव (गरबा)

**'सर्वमंगल्यमांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके,**
**शरण्ये त्रंबके गौरी नारायणी नमोस्तुते।।'**

बुधवार दि. ९ ऑक्टोबर २०२४ रोजी पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी विभागाच्या विद्यार्थ्यांनी गरबा जल्लोषात साजरा केला. त्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी गरब्याची वेशभूषा परिधान केली होती. मोठा शिशू वर्गाची विद्यार्थिनी कु. नव्या सावंत हिने कालिका माता साकारली होती. सर्व विद्यार्थी व शिक्षक यांनी गरबा नृत्य करून छान मजा केली. सर्व शिक्षकांनी आपापल्या वर्गात विद्यार्थ्यांना स्क्रीनवर दुर्गा मातेची गोष्ट दाखवली.

दि. ७ ते ९ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत पूर्व प्राथमिक इंग्रजी विभागाने नवरात्रोत्सव आणि दसरा मोठया उत्साहाने साजरा केला. पारंपरिक वेशभूषेत नटलेल्या विद्यार्थ्यांनी गरब्याद्वारे आपला आनंद व्यक्त केला आणि संस्कृतीचे दर्शन घडविले. दसऱ्याचा सण समाप्त करताना रावणाच्या प्रतिमेचे दहन करून मिळवलेला विजय प्रतिकात्मक पध्दतीने दाखविला गेला. अशा प्रकारच्या सणसमारंभांमधून आपल्या श्रेष्ठ संस्कृतीचे दर्शन तर घडतेच शिवाय विद्यार्थ्यांना चांगल्या वर्तनाने वाईटाचा नाश होतो हे शिकायला मिळते. दोन्ही विभागांच्या विद्यार्थ्यांना शेव-बुंदीचा प्रसाद वाटून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## विद्याभवन प्राथमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**मुख्याध्यापिका : श्रीमती अनघा संतोष सावंत**

### सेवानिवृत्ती समारंभ

दि. ३० सप्टेंबर २०२४ रोजी प्राथमिक इंग्रजी विभागाच्या ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती शोभा मिलिंद हरवंदे आपल्या ३२ वर्ष कालखंडाच्या सेवेतून नियत वयोमानानुसार निवृत्त झाल्या. सेमिनार हॉलमध्ये आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, अनुसंधान समिती सदस्य प्राचार्य के. एन्. शिरकांडे तसेच कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ उपस्थित होते.

प्राथमिक इंग्रजी विभागाचे सहा.शिक्षक श्री. दीपक निचित यांनी श्रीमती शोभा हरवंदे यांचा जीवनपट उलगडून सांगितला. तसेच त्यांच्या बद्दलच्या जुन्या आठवणी सांगितल्या. मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत यांनी दिलेल्या गौरव चिन्हा वरील मजकूर सर्वांना वाचून दाखवला.

आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी संस्थेची होत असलेली वाटचाल सर्वांसमोर मांडली. या जुन्या जाणत्या शिक्षकांनी विद्याभवनचा जो भरभक्कम पाया घातला त्यावर आज ही इमारत डौलाने, दिमाखात उभी आहे असे स्पष्टपणे नमूद केले.

जुन्या सेवानिवृत्त शिक्षकांचे विद्याभवनच्या वाटचालीमध्ये मोलाचे योगदान आहे. आपल्या आरोग्याकडे सर्वांनी लक्ष द्यावे, आर्थिक साक्षरता किती महत्त्वाची आहे हे देखील त्यांनी उपस्थितांना समजावून सांगितले. जर एखादी व्यक्ती अगदी दहा हजार पगार असूनही आपल्या पैशाचे चांगल्या पध्दतीने आर्थिक नियोजन करत असेल तर, ती एक लाख रुपये पगार असणाऱ्या आणि त्या पगाराचे व्यवस्थित नियोजन न करणाऱ्या व्यक्ती पेक्षाही कशी पुढे जाऊशकते हे पटवून दिले.

विद्याभवन शैक्षणिक संकुलात होऊ घातलेल्या, तीन मजल्यांचे ७० हजार स्क्वेअर फूट काम लवकरच सुरू होणार आहे, अशी ग्वाही त्यांनी उपस्थित सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांना दिली. विद्याभवनचा हा डोलारा आपल्या सर्वांच्या अथक परिश्रमाने आणि साक्षीने उभा राहत आहे याचा अभिमान आम्हा संस्था चालकांना वाटतो असे कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी सांगितले.

प्राथमिक मराठी विभागाचे मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे यांनी श्रीमती शोभा हरवंदे यांच्या विषयी आपल्या भावना बोलून दाखवल्या. सर्वसामान्य शिक्षक जेव्हा आपल्या वयाच्या ३० पेक्षा अधिक वर्षे एका शाळेत घालवतो म्हणजेच आयुष्यातील ७० टक्के भाग शाळेसाठी देत असतो. अशा या शिक्षकाचे शाळेसाठी योगदान फार महत्त्वाचे असते.

विद्याभवन माध्यमिक विभागाच्या उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केल. प्राथमिक इंग्रजी विभागाच्या समन्वयिका व प्राथमिक इंग्रजी विभागाच्या माजी मुख्याध्यापिका श्रीमती शुभांगी जाधव यांनी श्रीमती शोभा हरवंदे यांच्या बद्दलच्या आपल्या भावना व्यक्त केल्या. विद्यार्थ्यांशी असलेला सुसंवद, वेळेच्या आत शाळेत उपस्थित राहून आपले काम पूर्ण करणे, या आणि अशा गोष्टी श्रीमती शोभा हरवंदे यांच्याकडून शिकण्यासारख्या आहेत असे सांगितले.

आपल्या सत्काराला उत्तर देताना श्रीमती शोभा हरवंदे यांनी आपण सर्वांचे ऋणी आहोत, विद्याभवनने मला खूप काही दिले असे सांगितले. प्रत्येकाला कौतुकाचे दोन शब्द हवे असतात. दुसऱ्याच्या प्रति आपण कृतार्थ राहून त्यांना धन्यवाद देत राहूया. एक त्रयस्थ शक्ती असते जी आपल्याला मदत करत असते. अशा परमात्म्याचे आपण आभार मानूया. तसेच आपण सर्वांनी आपल्या आरोग्याला जपावं असा मोलाचा सल्ला त्यांनी सर्वांना दिला.

याप्रसंगी श्रीमती शोभा हरवंदे यांचे पती श्री. मिलिंद हरवंदे देखील आवर्जून उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती रेश्मा पैलकर व आभार प्रदर्शनाचे काम सहा.शिक्षिका श्रीमती चंदा भटकर यांनी केले.

### शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धा

दि. १.१०.२०२४ ते ३१.१२.२०२४ या कालावधीत राज्यातील शिक्षकांसाठी महाराष्ट्र शासनातर्फे दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या अंतर्गत खालील शिक्षकांना तालुकास्तरीय पारितोषिके मिळाली.

| **शिक्षकांची नावे** | **क्रमांक** |
|---|---|
| श्रीमती स्वप्ना गायकवाड (इ. १ली व २री) | प्रथम |
| श्रीमती हरप्रीत कौर जसवाल (इ. ३री व ४थी) | प्रथम |
| श्रीमती अनघा सावंत (इ. ३री व ४थी) | तृतीय |

**सर्व विजेत्या शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन!**

### 'फिरते माईंड जिम' कार्यशाळा

सुसंस्कृत, सुस्वभावी, विज्ञाननिष्ठ, तेजस्वी पिढी घडविण्यासाठी मनःशक्ती केंद्र लोणावळा यांच्यातर्फे 'फिरते माईंड जिम' कार्यशाळा पुणे विद्यार्थी गृह विद्याभवन शैक्षणित संकुलात आप्पासाहेब गरगटे सभागृहात दि. ४ आणि ५ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ८.०० ते संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळेमध्ये उजव्या-डाव्या मेंदूच्या विकासासाठी ब्रेन बुस्टर ऍक्टिव्हिटीज, प्रत्यक्ष हाताळण्याजोगे आकर्षक आणि अभिनव खेळ, रंजकतेने मेंदू विकास आणि संस्कार करणारे प्रदर्शन, विद्यार्थ्यांना घडवणारे आणि सुजाण पालकात्वाची दिशा देणारे ग्रंथ प्रदर्शन, मेंदू विकासाचे घरी घेऊन जाता येतील असे प्रॉडक्ट्स् आणि सर्व पालक व मुलांचा एकत्र सहभाग असे विनामूल्य प्रवेश असलेली कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. अगदी के.जी. पासून तर पी. जी. पर्यंत सर्व विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घेतला. पालकांचाही उत्स्फूर्त सहभाग कार्यक्रमाला लाभला.

संस्थेकडून नेहमीच शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांसाठी असे नवनवीन उपक्रम राबवले जातात. हा देखील उपक्रम शिक्षक, पालक व विद्यार्थी यांना खूप आवडला. आपल्या पाल्याचा सर्वांगीण विकास करता येण्यासाठी मनःशक्ती केंद्राची कार्यशाळा नक्कीच उपयोगी येणार आहे असे मत पालकांनी प्रकट केले. विद्याभवन प्राथमिक इंग्रजी विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत यांनी या कार्यशाळेचा उपयोग शिक्षकांना कशा पध्दतीने करता येईल याचा सुखद अनुभव सांगितला.

### श्रावण बाळ

विद्याभवन शाखा प्राथमिक इंग्रजी व मराठी या दोन्ही विभागांना आप्पासाहेब गरगटे सभागृहामध्ये आमदार श्री. राम कदम यांनी 'श्रावण बाळ' योजनेची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी आपल्या गुरूजनांचे, आई-वडिलांचे ऐकावे, त्यांची मनोभावे सेवा करावी, मोबाईल, टि.व्हि. पासून स्वतःला दूर ठेवावे आणि जे हे सर्वजण करतील त्यांच्यासाठी आलिशान गाडयांमधून मुंबईत मोफत प्रवास आयोजित केला जाईल व मोठया सिने अभिनेत्यांना भेटण्याची संधी देण्यात येईल. मा. मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते अशा संस्कारी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येईल. विद्यार्थ्यांप्रती चांगले संस्कार व्हावेत त्यासाठी विद्याभवनचे माजी विद्यार्थी व आमदार श्री. राम कदम नेहमीच सक्रिय असतात. प्रत्येक वेळी दुसऱ्यांच्या सुखदुःखात धावून जाणे, वृध्दांना धार्मिक यात्रा घडवून आणणे, भुकेलेल्यांना अन्न देण, गोरगरिबांच्या ज्या काही समस्या असतील त्या सोडविण्यासाठी ते सर्वांनाच ज्ञात आहेत. बुधवार दि. ९ ऑक्टोबर २०२४ रोजी इ. १ली ते ४थी च्या घाटकोपर पश्चिम विभागातील वास्तव्यात असलेल्या विद्यार्थ्यांना त्यांनी संबोधित केले.

याप्रसंगी समन्वयिका श्रीमती शुभांगी जाधव, प्राथमिक इंग्रजी विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत, प्राथमिक मराठी विभागाचे मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे, श्री. काशीद, व श्री. सूर्यकांत गवळी आवर्जून उपस्थित होते. संस्थेच्या वतीने मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहा.शिक्षक श्री. दीपक निचित यांनी केले.

## विद्याभवन प्राथमिक मराठी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापक : श्री. गणेश सुदाम कणसे**

### पालकांसाठी व्याख्यान

शुक्रवार दि. ४ ऑक्टोबर २०२४ रोजी 'मुलांच्या वर्तन विषयक समस्या व पालकांचा ताण - तणाव समस्या व उपाय' या विषयावर मनःशक्ती केंद्र लोणावळा यांच्यातर्फे इ. १ली ते ४थी च्या पालकांसाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या उपक्रमाला पालकांनी चांगला प्रतिसाद दिला व

मन:शक्ती केंद्राद्वारे मुलांच्या वर्तन विषयक समस्यांचे निराकरण केले.

**विविध प्रकारचे बौध्दिक खेळ**

शनिवार दि. ५ ऑक्टोबर २०२४ रोजी मन:शक्ती लोणावळा यांच्यातर्फे इ. १ली ते ४थी विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारचे बौध्दिक खेळ आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी खेळात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला व आनंद लुटला. विद्यार्थ्यांना खेळ खूप आवडले.

**आंतरशालेय चित्रकला स्पर्धा**

बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग आयोजित एन् वॉर्ड अंतर्गत घेण्यात येणाऱ्या चित्रकला स्पर्धेत विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले.

| क्रमांक | विजेत्या विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता |
|---|---|---|
| प्रथम | आराध्या प्रवीण करंबटे | १ली |
| तृतीय | अन्वी दीपक पाटील | २री |
| चतुर्थ | वेदांत संतोष पठारे | ३री |
| तृतीय | आयुष अभिजित तोरणे | ४थी |

**गरबा नृत्य**

गुरुवार दि. १० ऑक्टोबर २०२४ रोजी इ. १ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांसाठी गरबा नृत्य आयोजित करण्यात आले होते. सर्व विद्यार्थी छान रंगीबेरंगी कपडे घालून आले होते. सर्व विद्यार्थ्यांनी गरबा नृत्याचा मनसोक्त आनंद लुटला. विद्यार्थ्यांनी खूप उत्साहाने सहभागी होऊन गरबा नृत्य केले.

## विद्याभवन माध्यमिक मराठी व कनिष्ठ महाविद्यालय

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**मुख्याध्यापिका : श्रीमती योगिनी राजेंद्र पोतदार**

**शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धा**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे मार्फत आयोजित शिक्षकांसाठी दर्जेदार व्हिडियो निर्मिती स्पर्धा २०२३ तालुकास्तरावर विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील सहा.शिक्षक श्री. रुपेश नथुराम मांडवेकर (गट - इ. ३री व ५वी/विषय - इंग्रजी) यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. श्री. रुपेश मांडवेकर यांचे हार्दिक अभिनंदन!

**स्वच्छता पंधरवाडा**

शिक्षण विभागातर्फे दि. १४ सप्टेंबर २०२४ ते १ ऑक्टोबर २०२४ दरम्यान स्वच्छता पंधरवाडा राबविण्यासाठी 'स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता' अशी थीम ठरविण्यात आली होती. या थीमनुसार विद्याभवन हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालयात खालील तीन स्तंभाप्रमाणे कार्यक्रमाचा समावेश करण्यात आला.

**१. स्वच्छता की भागीदारी** : या स्तंभाप्रमाणे विद्यार्थ्यांनी स्वच्छता जनजागृतीसाठी विविध प्रकाराची घोषवाक्ये तयार करून तक्ते बनविले. दि. ३० सप्टेंबर २०२४ रोजी शालेय परिसरात प्रभातफेरी काढण्यात आली. विद्यार्थ्यांनी विविध घोषणा देऊन जनजागृती केली.

**२. श्रमदानातून संपूर्ण स्वच्छता** : मोठ्या प्रमाणावर मोहीम यशस्वी करण्यासाठी विद्यार्थ्यांनी रस्त्यावरील कचरा गोळा करून तो सुक्या कचऱ्याच्या डब्यात टाकला. या मोहिमेत विद्यार्थ्यांसमवेत प्रशालेच्या उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई व शिक्षक यांनी ही सहभाग नोंदविला. दि. २७ सप्टेंबर २०२४ रोजी हे श्रमदान करण्यात आले.

**३. सफाई मित्र सुरक्षा शिबिर** : सफाई कामगारांची प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी विद्यालयातर्फे करण्यात आली. यामध्ये प्रशालेतील सर्व सफाई मित्र सहभागी झाले होते. 'स्वच्छ सुंदर परिसर, जीवन निरोगी निरंतर' या घोषवाक्याद्वारे जनमानसात स्वच्छता माहात्म्य बिंबवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**तंबाखू मुक्तीवर व्याख्यानाचे आयोजन**

गुरुवार दि. ३ ऑक्टोबर २०२४ रोजी 'सलाम बॉम्बे फाउंडेशन' व विद्याभवन हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आप्पासाहेब गरगटे सभागृहात इ. ७वी ते ९वी

च्या विद्यार्थ्यांसाठी 'तंबाखू मुक्ती' या विषयावरील चित्रफित व व्याख्यान यांचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी तंबाखू सेवनाचे दुष्परिणाम तंबाखूमुळे होणारे प्राणघातक आजार तसेच तंबाखू व तंबाखूजन्य इतर उत्पादने यांचे सेवन न केल्याने होणारे फायदे याबद्दलची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

या कार्यक्रमास प्रशालेच्या मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार, उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई, इ. ७वी ते ९वी चे सर्व विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन सहा.शिक्षक श्री. अर्जुन मस्के यांनी केले.

**उद्‌बोधन व्याख्यान**

शुक्रवार दि. ४ आणि ५ ऑक्टोबर २०२४ रोजी 'मनःशक्ती केंद्र', लोणवळा व विद्याभवन हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने सेमिनार हॉल येथे इ. ५वी ते १०वी च्या पालकांसाठी 'मुलांच्या वर्तणुकीविषयी समस्या, ताणतणाव व त्यावरील उपाय' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

त्यावेळी मुलांच्या चुका त्यांना समजावून सांगणे तसेच मुले फक्त हुशार न होता सुसंस्कारी ही व्हायला हवीत. यासाठी वय वर्षे १४ वयोगटातील मुलांची काळजी कशी घ्यावी? त्यांच्या वर्तनविषयक समस्या सोडविण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात याविषयी माहिती देण्यात आली.

तसेच आप्पासाहेब गरगटे सभागृहात मनःशक्ती केंद्रातर्फे इ. ५ वी ते १०वी च्या विद्यार्थ्यांची बौध्दिक क्षमता वाढावी व त्यांना एकाग्रता साधता यावी यासाठी विविध खेळांची मांडणी करण्यात आली होती. कृतियुक्त सहभाग घेऊन प्रत्येक विद्यार्थ्याने खेळाचा आनंद लुटला.

**सहशालेय स्पर्धा**

महाराष्ट्र राज्य जवाहर बालभवन मुंबई आयोजित सहशालेय उपक्रमांतर्गत एन वॉर्ड स्तरीय विविध स्पर्धांमध्ये प्रशालेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले.

✽ एकपात्री अभिनय स्पर्धेत छोट्या गटात कु. आसावरी अमोल पाटील इ. ७वी/अ हिने तृतीय क्रमांक पटकावला.

✽ वक्तृत्व स्पर्धेत मोठ्या गटात कु. दुर्गा महेश पाटील इ. १०वी/अ हिने प्रथम क्रमांक पटकावला.

✽ लोकनृत्य स्पर्धेत मोठया गटाने प्रथम क्रमांक इ. ९वी तर लहान गटाने इ. ८वी द्वितीय क्रमांक पटकावला.

**कबड्डी स्पर्धा**

जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर आयोजित तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलांच्या गटात एकूण ८२ संघांनी सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांनी उत्तम खेळाचे प्रदर्शन करत, जिद्द चिकाटी, शिस्तबध्द खेळ आणि कौशल्य यांच्या जोरावर उपांत्य फेरीपर्यंत मजल मारली.

आपल्या शाळेचा प्रत्येक सामना पाहताना इतर शाळांतील विद्यार्थी, शिक्षक व इतर प्रेक्षक प्रोत्साहन देत होते आणि ते आपल्या विद्यार्थ्यांचा खेळ पाहून विद्यार्थ्यांच्या खेळाचे कौतुक देखील करत होते.

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!**

**वाचन प्रेरणा दिन**

मंगळवार दि. १५ ऑक्टोबर २०२४ रोजी विद्याभवन हायस्कूल, घाटकोपर आप्पासाहेब गरगटे सभागृहात वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमात इ. ८वी अ, ब, क च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. तसेच इतर वर्गाच्या सर्व विद्यार्थ्यांनी वर्गस्तरावर वाचन प्रेरणा दिवस साजरा केला.

इ. ८वी/अ चे वर्गशिक्षक श्री. पद्माकर शिंगटे यांनी वाचन प्रेरणा दिनाचे महत्त्व विशद केले. विद्यार्थ्यांनी यानिमित्ताने डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या पुस्तकांविषयी माहिती सांगितली. अनेक कथांचे सादरीकरण केले.

मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थी जीवनात वाचन किती महत्त्वाचे आहे. तसेच केवळ अभ्यासासाठी वाचन न करता अवांतर वाचन करा. वाचनात व्यक्तीच्या जीवनात आमूलाग्र बदल करण्याची क्षमता आहे. शंभर मित्रांपेक्षा एक पुस्तक मित्र श्रेष्ठ असतो. दिवाळीच्या सुट्टीत कोणत्याही एका पुस्तकाचे वाचन करून त्याबद्दलचे मत १० ओळीत मांडावे असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

या कार्यक्रमास मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार आणि उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई हया उपस्थित होत्या. इ. ८वी/अ च्या विद्यार्थ्यांनी सूत्रसंचालन केले व आभार व्यक्त केले.

**गुरूवर्य कुलगुरू श्री. दादासाहेब केतकर पुण्यतिथी**

बुधवार दि. १६.१०.२०२४ रोजी प्रशालेच्या सभागृहात कुलगुरू दादासाहेब केतकर यांची ७४वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष डॉ. बा. गो. कुलकर्णी, मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार, प्राचार्य श्री. अजयकुमार पाठक, माध्यमिक इंग्रजी विभागाच्या उपमुख्याध्यापिका श्रीमती लता नायर व पर्यवेक्षक श्री. पवार, समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन् यांच्या हस्ते कुलगुरू दादासाहेब केतकर यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले.

डॉ. बा. गो. कुलकर्णी यांनी कुलगुरू दादासाहेब केतकर यांचा थोडक्यात परिचय करून दिला व कुलगुरू दादासाहेब केतकर यांची शिकवण, त्यांचे गुण आत्मसात करावे असे सांगितले. त्याचबरोबर त्यांचा आदर्श डोळयासमोर ठेऊन त्यांच्यासारखे सामाजिक कार्य करावे असे आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना सूचित केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सहा.शिक्षिका श्रीमती जयश्री सुतार यांनी केले.

## विद्याभवन माध्यमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापक : श्री. सुनिल भालचंद्र पाटील**

**सहशालेय स्पर्धा**

महाराष्ट्र राज्य जवाहर बालभवन मुंबई आयोजित सहशालेय उपक्रमांतर्गत एन वॉर्ड स्तरीय विविध स्पर्धांमध्ये विद्याभवन हायस्कूल नं. २ च्या खालील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केलेः

| स्पर्धा | गट | विद्यार्थ्यांचे नाव | क्रमांक |
|---|---|---|---|
| लोकनृत्य | मोठा | | तृतीय |
| चित्रकला | मोठा | कु. तनिष्का कांबळे इ. १०वी | द्वितीय |
| | छोटा | कु. हर्षल वर्मा इ. ६वी | प्रथम |
| एकपात्री अभिनय | मोठा | कु. तनिष्का साबळे इ. ९वी | द्वितीय |
| वाद्य संगीत | मोठा | कु. आर्यन पिंगट इ. ९वी | द्वितीय |
| वक्तृत्व | मोठा | कु. अनन्या पाटील इ. ९वी | तृतीय |

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे प्रशालेच्या वतीने हार्दिक अभिनंदन!**

**शिक्षक दिन**

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्ण यांच्या जन्मदिनानिमित्त दि. ५ सप्टेंबर २०२४ रोजी संपूर्ण देशात शिक्षक दिन साजरा करण्यात येतो. या दिवसाचे औचित्य साधून विद्याभवन संकुल घाटकोपरमध्ये विद्यार्थ्यांनी शिक्षक दिन अतिशय उत्साहात साजरा केला. या दिवशी

विद्याभवन हायस्कूल नं. २ च्या इ. १०वी च्या विद्यार्थ्यांनी इ. ५वी ते ९वी या वर्गांना शिकविण्याची व सांभाळण्याची जबाबदारी घेतली. पूर्वतयारी म्हणून दोन दिवस आधी विषय वाटप करण्यात आले. या विषयांचे आणि वर्गाचे वेळापत्रक तंतोतंत पाळण्यात आले. सर्व वर्गांमध्ये या दिवशी शिस्त आणि आनंदपूर्ण वातावरण दिसून आले. शिक्षकांनासुध्दा या दिवशी रोजच्या जबाबदारीपासून मुक्त असा मोकळा वेळ मिळाला.

**हिंदी दिवस**

दि. १४ सप्टेंबर २०२४ रोजी हिंदी दिवसाचे औचित्य साधून विद्याभवन हायस्कूल नं. २ मध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. आप्पासाहेब गरगटे सभागृहात विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेतून नृत्य, नाटिका, दोहे, वक्तृत्व, काव्यवाचन इत्यादी सादर केले. मुख्याध्यापक श्री. सुनिल पाटील यांनी हिंदी भाषेचे महत्त्व समजावून सांगत विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या मेहनतीचे कौतुक केले आणि भविष्यात हिंदी भाषेचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी प्रोत्साहन दिले.

**आनंददायी शनिवार**

शासनाच्या परिपत्रकानुसार विद्याभवन क्र. २ मध्ये आनंददायी शनिवार दि. १४ सप्टेंबर २०२४ रोजी इ. ५वी ते ८वी च्या विद्यार्थ्यांसाठी साजरा करण्यात आला. या दिवशी कृतियुक्त शिक्षण आणि संघभावना विचारात घेऊन उपक्रम राबविण्यात आले.

**उपक्रम १ : शैक्षणिक तक्ते तयार करणे**

विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीचा विषय आणि घटक निवडून, त्याचे विश्लेषण करून त्यावर अभ्यासास उपयुक्त असे तक्ते तयार केले.

**उपक्रम २ : वर्ग सजावट**

तयार केलेले तक्ते दर्शनी भागात तसेच विद्यार्थ्यांना उजळणी करता येईल अशा ठिकाणी वर्गात लावून वर्ग सजावट करण्यात आली.

**निष्पत्ती** : या उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील निरीक्षण क्षमता, विश्लेषण कौशल्य, संघभावना इत्यादी बाबींचा विकास झाला.

आनंददायी शनिवार २१.०९.२०२४ रोजी साजरा करण्यात आला. या दिवशी आहार, स्वास्थ आणि भारतीय आहाराचे महत्त्व यांना विचारात घेऊन उपक्रम राबविण्यात आले.

**उपक्रम १ : भाज्यांचे सँडविच तयार करणे**

विद्यार्थ्यांनी घरून विविध भाज्या कापून तसेच वाफवून आणल्या आणि वर्गात पौष्टिक सँडविच तयार केले. यामध्ये विद्यार्थ्यांनी गट तयार करून एकमेकांच्या सहकार्याने कृती पूर्ण केली.

**उपक्रम २ : विविध डाळी वापरून कलाकृती तयार करणे**

विविध डाळी वापरून विद्यार्थ्यांनी नवनवीन कलाकृती तयार केल्या. तसेच यामाध्यमातून विद्यार्थ्यांना डाळींची ओळख झाली.

**निष्पत्ती** : या उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील पाककला, आरोग्याबद्दल जागरूकता, एकाग्रता, नियोजन इत्यादी बाबींचा विकास झाला.

आनंददायी शनिवार दि. २८.०९.२०२४ रोजी साजरा करण्यात आला. या दिवशी कलात्मकता आणि सर्जनशीलता विचारात घेऊन उपक्रम राबविण्यात आले.

**उपक्रम १ : कोलाज् तयार करणे**

विद्यार्थ्यांनी रंगीबेरंगी कागदांचे तुकडे, लहान वस्तू यांचे संकलन करून आपल्या आवडीचे आकार कागदावर रेखाटून त्यावर कलात्मक रीतीने कोलाज् काम केले.

**उपक्रम २ : आइस्क्रिम काडयांपासून शोभेच्या वस्तू तयार करणे**

विद्यार्थ्यांनी आइस्क्रिम काडया रंगवून त्यांपासून विविध शोभेच्या तसेच उपयोगी वस्तू तयार केल्या.

**निष्पत्ती** : या उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील कलाकुसरता, सर्जनशीलता, एकाग्रता, नियोजन इत्यादी बाबींचा विकास झाला.

आनंददायी शनिवार ०२.१०.२०२४ रोजी साजरा करण्यात आला. या दिवशी पारंपरिक कला शिक्षण

आणि संस्कृती दर्शन हे मुद्दे विचारात घेऊन उपक्रम राबविण्यात आले.

**उपक्रम १ : पणत्या रंगकाम**

विद्यार्थ्यांनी घरून मातीच्या पणत्या आणून त्यावर आकर्षक रंगकाम केले व सोनेरी, चंदेरी टिकल्यांनी पणत्या सजविल्या.

**उपक्रम २ : आकाश कंदील तयार करणे**

रंगीत कागद, कात्री, गोंद, चकाकी इत्यादी साहित्य वापरून विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे आकाश कंदील तयार केले.

**निष्पत्ती** : या उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी पारंपरिक कलांमधून निसर्ग संवर्धन कसे केले जाते हे जाणून घेतले. तसेच स्वनिर्मितीतून आनंदाची अनुभूती घेतली.

**शिबिराचे आयोजन**

दि. २१ सप्टेंबर २०२४ रोजी विद्याभवन संकुल घाटकोपरच्या आप्पासाहेब गरगटे सभागृहात पोगो वाहिनी, डेटॉल हॅण्डवॉश आणि क्लासमेट यांच्या संयुक्त विद्यमाने इ. ५वी ते ८वी च्या विद्यार्थ्यांसाठी शिबिर आयोजित करण्यात आले होते. पोगो वाहिनी आणि कंपनीचे प्रतिनिधी श्रीमती गायत्री सुरेश, श्रीमती अदिती वर्मा, श्री. क्रिश शहा यांनी विद्यार्थ्यांना विविध खेळ आणि कृतींमधून स्वच्छतेचे महत्त्व समजावले आणि विजयी स्पर्धकांना डेटॉल हॅण्डवॉश किट बक्षिस दिले. 'क्लासमेटच्या' तर्फे नवीन हूक पेन, मॅजिक पेन बद्दल माहिती देत, लिखाण आणि अभ्यासाचे महत्त्व समजावले. स्वच्छता, खेळ आणि अभ्यास यांचे महत्त्व आणि नियोजन या शिबिरातून समजविण्यात आले.

**श्लोक पाठांतर स्पर्धा**

दि. २२ सप्टेंबर २०२४ रोजी हरहरपुत्रा भजन, चेंबूर समाजातर्फे श्लोक पाठांतर स्पर्धा घेण्यात आली. सदर स्पर्धेत विद्याभवन हायस्कूल नं. २ च्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले. विजेत्यांची नावे पुढील प्रमाणे

| **क्रमांक** | **विद्यार्थ्यांची नावे** | **इ /तु** |
|---|---|---|
| द्वितीय | कु. दुर्वा सावकार शिर्दे | ५वी/ब |
| तृतीय | कु. सृष्टी दयानंद सुतार | ५वी/ब |
| द्वितीय उत्तेजनार्थ | कु.कौस्तुभी संतोष नलावडे | ६वी/क |

विजेत्यांना प्रमाणपत्र, बक्षीस आणि भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

**बास्केटबॉल स्पर्धा (मुली)** :

महाराष्ट्र शासनाच्या वतीने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई आयोजित १४ वर्षांखालील मुलींची तालुकास्तरीय बास्केटबॉल स्पर्धा नुकतीच संपन्न झाली. सदर स्पर्धेचा अंतिम सामना दि. २२ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ८.०० वाजता विद्याभवन हायस्कूल नं. २ विरुध्द गरोडिया हायस्कूल, घाटकोपर या संघांमध्ये राजहंस विद्यालय अंधेरी, मुंबई येथे पार पडला.

या सामन्यात विद्याभवन हायस्कूल नं. २ च्या मुलींच्या संघाने गरोडिया हायस्कूलचा १५ गुणांनी दणदणीत पराभव करून तालुकास्तरीय १४ वर्षांखालील मुलींच्या बास्केटबॉल सामन्याचे अंतिम विजेतेपद पटकाविले. विजेत्या संघाचे व प्रशिक्षक श्री. सोनेश झोरे यांचे हार्दिक अभिनंदन व जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा!

**शालेय वक्तृत्व स्पर्धा**

दि. २३ सप्टेंबर २०२४ रोजी विद्याभवन हायस्कूल नं. २ तर्फे, आप्पासाहेब गरगटे सभागृहात इ. ९वी आणि १०वी च्या विद्यार्थ्यांसाठी उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमधील प्रसंगावधानता, हजरजबाबीपणा, वक्तृत्व कौशल्य, भाषेवरील प्रभुत्व इत्यादी बाबी या स्पर्धेतून दिसून आल्या. स्पर्धेचे परीक्षण इंग्रजी उपमुख्याध्यापिका श्रीमती लता नायर आणि सहा.शिक्षिका श्रीमती राजेश्वरी कोणार यांनी केले तसेच स्पर्धक आणि श्रोत्यांना मोलाचे मार्गदर्शनही केले. विजेत्या स्पर्धकांची नावे पुढीलप्रमाणे :

| क्रमांक | विद्यार्थ्यांची नावे | इ /तु |
|---|---|---|
| प्रथम | कु. संचिता भूषण चव्हाण | १०वी/ब |
| द्वितीय | कु. अद्वैता लहू माने | १०वी/अ |
| तृतीय | कु. प्रांजल सोमनाथ बोऱ्हाडे | १०वी/अ |

**बास्केटबॉल स्पर्धा (मुले)**

शनिवार दि. २८ सप्टेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र शासनाच्या वतीने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई आयोजित १७ वर्षांखालील मुलांची तालुकास्तरीय बास्केटबॉल स्पर्धा अंधेरी येथील राजहंस विद्यालयात उत्साहाने पार पडली. एकूण २२ संघ सहभागी झालेल्या या स्पर्धेत विद्याभवन हायस्कूल नं. २ च्या मुलांच्या संघाने अंतिम सामन्यात सेंट ग्रेगोरियस हायस्कूल, चेंबूर या संघाला ६ गुणांनी हरवून तालुकास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेचे अजिंक्यपद पटकाविले.

विशेष म्हणजे विद्याभवन हायस्कूल नं. २ च्या १४ वर्षांखालील मुली, १७ वर्षांखालील मुली आणि १७ वर्षांखालील मुले या तीनही बास्केटबॉल संघांनी तालुकास्तरीय अंतिम विजेतेपद पटकाविले आहे. संघांचे प्रशिक्षक श्री. सोनेश झोरे यांचे व सर्व विजेत्या खेळाडूंचे सर्वत्र कौतुक होत आहे. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, मुख्याध्यापक श्री. सुनिल पाटील तसेच सर्व पदाधिकारी व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या तीनही संघांचे कौतुक करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

**आंतरशालेय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा**

दि. २८ सप्टेबर २०२४ रोजी एस्. आय. इ. एस्. (डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम मेमोरियल) हायस्कूल येथे अनंतनारायण आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेत पुणे विद्यार्थी गृहाचे विद्याभवन हायस्कूल नं. २ च्या कु. शाल्मली समीर मोहिते या विद्यार्थिनीने द्वितीय क्रमांक पटकावून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. कु. शाल्मली मोहिते आणि मार्गदर्शक शिक्षकांचे खूप खूप अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!

**जिल्हास्तरीय बास्केटबॉल स्पर्धा**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने जिल्हा क्रीडा अधिकारी मुंबई उपनगर आयोजित राजहंस विद्यालय, अंधेरी येथे १४ वर्षांखालील मुलींची जिल्हास्तरीय बास्केटबॉल स्पर्धा मंगळवार दि. १ ऑक्टोबर २०२४ रोजी पार पडली. या स्पर्धेत विद्याभवन नं. २ या मुलींच्या संघाने उपविजेतेपद पटकाविले.

बुधवार दि. २ ऑक्टोबर २०२४ रोजी सेंट झेवियर्स कॉलेज, फोर्ट मुंबई येथे १७ वर्षांखालील मुलांची जिल्हास्तरीय बास्केटबॉल स्पर्धा पार पडली. सदर स्पर्धेच्या अंतिम सामन्यात विद्याभवन हायस्कूल नं. २ ने जमनाबाई नरसी स्कूल, जुहू मुंबई या शाळेचा अटीतटीच्या सामन्यात ४ गुणांनी पराभव करून जिल्हास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेचे अंतिम विजेतेपद पटकाविले.

विजेत्या व उपविजेत्या संघाचे कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे तसेच सर्व पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी/विभागीय स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा!

**तंबाखूमुक्ती जागरूकता कार्यक्रम**

दि. १ ऑक्टोबर २०२४ रोजी सलाम बॉम्बे फाउंडेशनतर्फे विद्याभवन हायस्कूल नं. २ तर्फे आप्पासाहेब गरगटे सभागृहात इ. ७वी व ८वी तील विद्यार्थ्यांसाठी तंबाखू विरुध्द जागृती शिबिर आयोजित करण्यात आले होते. श्रीमती दीपाली कानोजिया आणि श्रीमती पूर्णिमा लेंढे यांनी विद्यार्थ्यांना विविध स्वरूपात वापरण्यात येणारी तंबाखू आणि त्याचे आरोग्यावर होणारे दीर्घकालीन तसेच आपत्कालीन घातक परिणाम स्पष्ट केले. तंबाखूमध्ये असणारे निकोटिन आणि अमोनिया यांच्या सेवनाचे दुष्परिणाम देखील स्पष्ट केले. PECA ॲक्ट २०१९ आणि त्याद्वारे होणारी शिक्षा याबद्दल सुध्दा चर्चा करण्यात आली. तंबाखूचा वापर टाळून जीवन समृध्द कसे करता येईल याबद्दल चर्चा करून कार्यक्रमाची सांगता झाली.

## कुस्ती स्पर्धा

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर यांच्या वतीने १४ वर्षांखालील मुलांची जिल्हास्तरीय कुस्ती (फ्री स्टाईल) स्पर्धा वर्षानगर एम्. पी. एस्. शाळा, विक्रोळी (पश्चिम), मुंबई येथे मंगळवार दि. १ ऑक्टोबर २०२४ रोजी घेण्यात आली. सदर स्पर्धेत विद्याभवन हायस्कूल नं. २ चा विद्यार्थी कु. साईराज दिलीप येळवे इ. ७वी या विद्यार्थ्याने द्वितीय क्रमांक प्राप्त करून सिल्वर मेडल पटकाविले. कु. साईराज येळवे याचे विद्याभवन संकुलातर्फे हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी खूप-खूप शुभेच्छा!

## आर्चरी स्पर्धा

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर यांच्या वतीने १७ वर्षांखालील मुलांची जिल्हास्तरीय आर्चरी, इंडियन राऊंड (३० आणि ४० मीटर) ही स्पर्धा प्रबोधन क्रीडा संकुल, सिध्दार्थ नगर, गोरेगाव (पश्चिम), मुंबई येथे दि. ९ ऑक्टोबर २०२४ रोजी घेण्यात आली. सदर स्पर्धेत विद्याभवन हायस्कूल नं. २ चा विद्यार्थी कु. विहंग यतिन म्हात्रे इ. ९वी या विद्यार्थ्याने द्वितीय क्रमांक मिळवून सिल्वर मेडल पटकाविले.

कु. विहंग यतिन म्हात्रे या विद्यार्थ्याने सोमवार दि. १४ ऑक्टोबर २०२४ रोजी कर्नाळा स्पोर्ट्स ॲकॅडमी, न्यू पनवेल येथे झालेल्या विभाग स्तर आर्चरी, इंडियन राऊंड (३० आणि ४० मीटर) या स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त करून राज्यस्तरावरील आर्चरी स्पर्धेस तो पात्र ठरलेला आहे. कु. विहंग यतिन म्हात्रे याचे विद्याभवन संकुलातर्फे पुन्हा एकदा हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा!

## वाचन प्रेरणा दिवस

भारताचे मिसाईल मॅन डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस हा वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा केला जातो. दि. १५.१०.२०२४ रोजी विद्याभवन हायस्कूल नं. २, घाटकोपर मध्ये प्रत्येक वर्गात वाचन प्रेरणा दिनानिमित्त विविध उपक्रम राबविले. पुस्तक वाचन, वक्तृत्व, फलक लेखन, उतारा वाचन इत्यादी उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांनी वाचनाचे महत्त्व समजून घेतले आणि डॉ. अब्दुल कलाम यांना आदरांजली वाहिली.

***

**❊ महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ३० ❊**



शनिवार दि. १४ सप्टेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र राज्य लोकशाही आघाडी (टीडीएफ) यांचेतर्फे 'आदर्श शिक्षक पुरस्कार' स्वीकारताना सहाय्यक शिक्षक डॉ. ज्ञानेश्वर दाते, समवेत उपस्थित प्राचार्य व्हि. पी. गावडे आदी मान्यवर

# विद्याभवन संकुल
# नेरूळ शाखा, नवी मुंबई
**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**अभिनंदनीय**

नवी मुंबई महानगरपालिका क्रीडा व सांस्कृतिक विभागातर्फे दि. २ सप्टेंबर २०२४ रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात संपन्न झाला. या कार्यक्रम प्रसंगी आंतरराष्ट्रीय कबड्डीपटू, अर्जुन पुरस्कार विजेते सध्या डेप्युटी कमिशनर ऑफ पोलीस (ट्रॅफिक) ठाणे विभागात कार्यरत असणारे श्री. पंकज शिरसाट, माजी मंत्री व विद्यमान आमदार श्री. गणेश नाईक, क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या उपायुक्त श्रीमती अभिलाषा पाटील, जिल्हास्तरीय क्रीडा विभागाचे सदस्य श्री. धनंजय वनमाळी, श्री. सुधीर थळे, नवी मुंबई महानगरपालिकेच्या सचिव श्रीमती चित्रा बाविस्कर, क्रीडा प्रमुख रेवप्पा गुरव व इतर पदाधिकारी उपस्थित होते. महाराष्ट्र शासनाच्या उदात्त क्रीडा धोरणानुसार नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील शालेय क्रीडा स्पर्धांना सन २००९ पासून स्वतंत्र जिल्ह्याचा दर्जा प्राप्त झाला आहे. जिल्हास्तरीय शालेय इनडोअर व आऊटडोर क्रीडा स्पर्धेत विद्याभवन शैक्षणिक संकुल नेहमीच उत्कृष्ट कामगिरी करत आहे. वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये विद्यार्थी नैपुण्य प्राप्त करत आहेत. प्रातिनिधीक स्वरूपात विद्यार्थ्यांचा गौरव म्हणून कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, श्रीमती श्रीजा नायर, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक, श्री. सुहास राऊळ, श्रीमती जयश्री तिपायले हे या कार्यक्रमास उपस्थित होते.

**संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

# विद्याभवन प्राथमिक इंग्रजी शाळा
## नेरूळ शाखा, नवी मुंबई
**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**
**प्र. मुख्याध्यापिका : सौ. मनीषा मुळीक**

**मॅजिक शो व टिफिन बॉक्स वाटप**

दि. ३१ ऑगस्ट २०२४ रोजी हॅटसन कंपनीतर्फे विद्यार्थ्यांसाठी मॅजिक शोचे आयोजन करण्यात आले होते. श्री. दिनेश मिसाळ यांच्या हस्ते जादूगार व त्यांचे सहकारी यांचे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमात जादूगाराने विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या जादू करून दाखवल्या. या जादू बघताना विद्यार्थ्यांचा आनंद टाळ्यांच्या गजरातून व्यक्त होत होता. या कार्यक्रमानंतर हॅटसन कंपनीतर्फे विद्यार्थ्यांना टिफिन बॉक्सचे वाटप करण्यात आले. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, श्रीमती श्रीजा नायर, श्रीमती मनिषा मुळीक, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक, शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

# विद्याभवन पूर्व प्राथमिक इंग्रजी शाळा
## नेरूळ शाखा, नवी मुंबई
**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**
**पर्यवेक्षक : सौ. अस्मिता सलगर**

**कलागुण नैपुण्य स्पर्धा**

सांस्कृतिक कलादर्पण आंतरशालेय कलागुण नैपुण्य स्पर्धा २०२४, दि. १ सप्टेंबर २०२४ रोजी ठाणे येथे घेण्यात आली. या स्पर्धेतील विजेते विद्यार्थी पुढीलप्रमाणे

| विद्यार्थ्याचे नाव | स्पर्धा | क्रमांक |
|---|---|---|
| कु. अवंतिका प्रबोध फडके | कथाकथन | प्रथम |
| | गीतगायन | उत्तेजनार्थ |
| कु. अद्विक महेश कदम | कथाकथन | द्वितीय |
| कु. अद्वैत विशाल जोशी | कथाकथन | उत्तेजनार्थ |
| | वेशभूषा | उत्तेजनार्थ |

| | | |
|---|---|---|
| कु. यज्ञ चेतन हिंगे | कथाकथन | उत्तेजनार्थ |
| कु. शिवण्या औदुंबर भोसले | कथाकथन | उत्तेजनार्थ |

**कलागुण नैपुण्य स्पर्धा**

दि. १ सप्टेंबर २०२४ रोजी सांस्कृतिक कलादर्पण ठाणे यांच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी व शिक्षकांसाठी आंतरशालेय कलागुण नैपुण्य स्पर्धा बेडेकर कॉलेज, ठाणे येथे संपन्न झाल्या. यामध्ये गीतगायन, कथाकथन, वक्तृत्व, नृत्य, वेशभूषा इत्यादी स्पर्धांचा समावेश होता. यात पूर्व-प्राथमिक इंग्रजी विभागाच्या विद्यार्थ्यांनी व शिक्षिकांनी सुयश संपादन केले.

| विद्यार्थ्याचे नाव | स्पर्धा | क्रमांक |
|---|---|---|
| कु. माही भागवत नागरगोजे | वेशभूषा | उत्तेजनार्थ |
| | नृत्य | उत्तेजनार्थ |
| कु. अयांश विकास इंगळे | नृत्य | उत्तेजनार्थ |
| कु. धैर्य प्रतिक पाटील | वेशभूषा | उत्तेजनार्थ |
| कु. फातिमा सिद्दीक चौगुले | वेशभूषा | उत्तेजनार्थ |

| शिक्षकाचे नाव | स्पर्धा | क्रमांक |
|---|---|---|
| सौ. प्रीती प्रविण दाभाडे | गीतगायन | द्वितीय |

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे शाळेच्या व संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

**गणेशोत्सव**

दि. १३ सप्टेंबर २०२४ रोजी गणेशोत्सव साजरा करण्यात आला. सभागृहात सुंदर सजावट करण्यात आली होती व सुंदर सुशोभित पाटावर गणपती बाप्पांना विराजमान करण्यात आले होते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गणेशोत्सवाबद्दलची माहिती सांगितली. गणपती बाप्पांच्या घोषणा देत विद्यार्थ्यांनी जल्लोष केला. समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक यांच्या हस्ते बाप्पांची पूजा व आरती करून मोदकांचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. याप्रसंगी पर्यवेक्षिका, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सर्वांना मोदकांचा प्रसाद वाटण्यात आला. भक्तीमय वातावरणात हा उत्सव साजरा झाला. याच दिवशी ऑरेंज डे ही साजरा करण्यात आला.

# विद्याभवन प्राथमिक मराठी शाळा

## नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**
**मुख्याध्यापिका : सौ. सुवर्णा दिनेश मिसाळ**

**आनंददायी बाजार**

आनंददायी शनिवार या उपक्रमांतर्गत शनिवार दि. १७ ऑगस्ट रोजी विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेत आनंददायी बाजार भरविण्यात आला. आनंददायी शनिवार अंतर्गत विद्यार्थ्यांनी कापडी पिशव्या बनवल्या. पुढील शनिवारी विद्यार्थ्यांनी टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू बनविल्या व स्वत: छान छान राख्या बनवल्या, विविध दिवे सजविले. विद्यार्थ्यांनी स्वत:हून बनवलेल्या या वस्तूंचा बाजार भरविण्यात आला. शालेय सभागृहात विद्यार्थ्यांनी आपली दुकाने मांडली. आपण बनविलेले साहित्य ग्राहकांनी खरेदी करावे यासाठी विद्यार्थ्यांनी ग्राहकांशी उत्तम संवाद साधला. आपल्या मालाची / वस्तूंची वैशिष्ट्ये कथन करून आपल्या साहित्याची जाहिरात करून मालाची / वस्तूंची विक्री केली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना बाजारातील कौशल्य खरेदी-विक्री, नफा-तोटा ही गणितीय कौशल्ये तसेच स्वनिर्मितीचा आनंद घेता आला. शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात राख्यांची व कापडी पिशव्यांची खरेदी केली. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. स्वनिर्मितीतून त्यांनी कष्टाची कमाई केली. मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ तसेच पालकांनी या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले.

**टाकाऊ पासून टिकाऊ वस्तूंचे प्रदर्शन**

दि. १६ ऑगस्ट २०२४ रोजी टाकाऊ पासून टिकाऊ वस्तूंचे प्रदर्शन भरविण्यात आले. मुलांनी टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तू बनविल्या. यामध्ये जुन्या कपड्यांची पायपुसणी, फुलदाणी, शोभीवंत वस्तू, पेन स्टँड, नारळाच्या करवंटीपासून विविध वस्तू बनविण्यात आल्या. प्लॅस्टिक वस्तूंचा पुनर्वापर केला. पालकांनीही विविध वस्तू बनवून उत्स्फूर्त सहभाग

घेतला. या प्रदर्शनात विविध वस्तू मांडण्यात आल्या. मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा दिनेश मिसाळ, शिक्षकवृंद, शिक्षक व पालक उपस्थित होते.

## निसर्ग पूजा

'या करु या निसर्गपूजा तो सर्वांचा प्रेमळ राजा' अशी साद घालत दि. २१ ऑगस्ट २०२४ रोजी निसर्ग पूजा व मंगळागौरीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात व मंगलमय वातावरणात संपन्न झाला. या निसर्गाचे आपल्यावर अनंत उपकार आहेत. त्याचे आभार मानण्यासाठी व त्याची कृपादृष्टी सदैव आपल्यावर राहावी यासाठी निसर्गाला साकडे घालणारी ही निसर्ग पूजा. या कार्यक्रमासाठी अखिल भारतीय मराठी परिषद कोकण विभागाच्या उपाध्यक्षा डॉ. अरुंधती जोशी, कोटक बँकेचे फॅसिलिलेटर श्रीमती प्रतिभा, संस्थेचे हितचिंतक व देणगीदार के. एल. मोदी व त्यांचे सहकारी, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, श्रीमती मनिषा मुळीक, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, मराठी साहित्य परिषदेचे कार्यकर्ते श्री. संतोष मिसाळ, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. प्रमुख अतिथींच्या हस्ते दीप प्रज्वलन करुन कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. श्रीमती कविता तेंडुलकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांच्या हस्ते पाहुण्यांना श्रीफळ, गुलाबाचे रोपटे व पुस्तकरुपी भेट देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. निसर्गपूजेचे महत्त्व विशद करताना आकाश, वायू, जल, अग्नी, पृथ्वी या पंचतत्त्वांची पूजा कशी करायची हे स्पष्ट करत श्रीमती नूतन गवांदे व श्रीमती मेघाराणी जोशी यांनी पूजा सांगितली. त्यानंतर निसर्गाची आरती करण्यात आली. शिक्षकवृंदाने सुमधूर आवाजात श्रावणगीत व निसर्ग पोवाडा गायला. इ. १ली ते ७ वीच्या विद्यार्थिनींनी मंगळागौर सादर केली. प्रमुख अतिथी डॉ. अरुंधती जोशी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विजेची व पाण्याची बचत करा, निसर्गाचे संरक्षण व संवर्धन करा, ओला कचरा-सुका कचरा याचे वर्गीकरण करा, असा बहुमोल संदेश दिला. श्रीमती आरती औचर यांनी उपस्थितांचे आभार मानले. शिऱ्याचा गोड प्रसाद वाटून कार्यक्रमाची सांगता झाली.

## नेत्र तपासणी शिबीर

दि. २० ते २३ ऑगस्ट २०२४ या दरम्यान रत्नानिधी फाऊंडेशन तर्फे नेत्रतपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांचे डोळे तपासून डोळ्यांची काळजी कशी घ्यावी याचे मार्गदर्शन करण्यात आले. ज्या विद्यार्थ्यांना चष्म्याचा नंबर आहे त्यांना मोफत चष्मे बनवून दिले. शिक्षकांचे ही डोळे तपासून त्यांना ही मार्गदर्शन करण्यात आले.

## रंजक विज्ञान कार्यशाळा

दि. २४ ऑगस्ट २०२४ रोजी विद्याभवन सभागृहात मराठी विज्ञान परिषदेतर्फे 'रंजक विज्ञान' या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. मराठी विज्ञान परिषदेच्या प्रमुख श्रीमती चारुशीला जुईकर यांनी विद्यार्थ्यांना विविध प्रयोग, प्रात्यक्षिके करून दाखविली. प्रात्यक्षिके करत असताना श्रीमती चारुशीला यांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सहभागी केले. विज्ञानातील संकल्पना अगदी सोप्या पद्धतीने समजावून सांगितल्या. सदर कार्यक्रमासाठी मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष डॉ. किशोर कुलकर्णी आणि मराठी विज्ञान परिषदेचे सदस्य श्री. विनय दिनकर उपस्थित होते.

## कृत्रिम बुद्धिमत्तेचा शिक्षण क्षेत्रात उपयोग - प्रशिक्षण

दि. २९ ऑगस्ट २०२४ रोजी दोस्ती हाऊस यांच्या वतीने 'शिक्षण आणि मूल्यांकनासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर' या विषयावर शिक्षकांसाठी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. सदर प्रशिक्षण दोस्ती हाऊस, यू. एस. कौन्सलेट जनरल, मुंबई येथे संपन्न झाले. श्री. मुरारी झा यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर शिक्षण क्षेत्रात कशाप्रकारे करता येऊ शकतो याबाबत सखोल मार्गदर्शन केले. २१ व्या शतकात नवीन पिढी घडवत असताना शिक्षकाने कसे अद्ययावत् राहावे याबाबत चांगले मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणासाठी प्राथमिक मराठी विभागातून श्रीमती राधिका अक्षय भोसले या उपस्थित होत्या.

## सेवा सहयोगतर्फे मोफत हेल्मेट वाटप

दि. ३० ऑगस्ट २०२४ रोजी सेवा सहयोग फाऊंडेशन व आय. सी. आय. सी. आय. लोम्बार्ड यांच्या संयुक्त विद्यमाने विद्याभवन शैक्षणिक संकुलात 'राईड टू सेफ्टी' अंतर्गत कार्यक्रम घेण्यात आला. सेवा सहयोग फाऊंडेशन ही नॉन प्रॉफिट ऑर्गनायझेशन समाजातील वंचित घटकांच्या विकासासाठी वैयक्तिक, संस्थात्मक आणि सामुदायिक स्तरावर शिक्षण, सक्षमीकरण आणि पर्यावरण या घटकांवर २००९पासून कार्य करीत आहे. नवी मुंबईत या संस्थेकडून चालू असलेल्या अनेक प्रकल्पांपैकी 'राईड टू सेफ्टी' हा प्रकल्प समन्वयक रेश्मा पद्मम आणि ऋतिका शेलार यांच्या मदतीने विद्याभवन संकुलात घेण्यात आला. विद्याभवन संकुलातील दुचाकीवर प्रवास करणाऱ्या विद्यार्थी, पालक तसेच शिक्षकांना मोफत हेल्मेट वाटप करण्यात आले. श्रीमती ऋतिका शेलार यांनी अपघात होऊ नये म्हणून कोणती काळजी घ्यावी याविषयी मार्गदर्शन केले. हेल्मेट म्हणजे आपली सुरक्षितता Head, Eyes, Lipes, Mouth, Ear, Teeth चेहऱ्यावरील अवयवांना सुरक्षा देणारे कवच म्हणजे हेल्मेट. दिलेल्या हेल्मेटचा वापर विद्यार्थी व पालकांनी दररोज करावा असे त्यांनी आवाहन केले. या कार्यक्रमास कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, श्रीमती श्रीजा नायर, श्रीमती मनिषा मुळीक, श्री. गोरख कदम, समन्वयक, पर्यवेक्षक, सर्व शिक्षक, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.

## मुलींच्या आरोग्याविषयी व्याखान

दि. २८ ऑगस्ट २०२४ रोजी इ. ५वी ते ७ वीच्या विद्यार्थिनींसाठी आरोग्य व वैयक्तिक स्वच्छता या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. प्रॉक्टर अॅन्ड गॅम्बल कंपनी तर्फे श्रीमती अंकिता पवार यांनी मुलींच्या आरोग्याविषयी व मासिक पाळी दरम्यान घ्यावयाची काळजी या विषयी मार्गदर्शन केले. वैयक्तिक स्वच्छता ठेवावी, सकस आहार घ्यावा, व्यायाम करावा, बाहेरचे पदार्थ खाणे टाळावे व आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी. आई आपली बेस्ट फ्रेंड असते, तिच्याशी मनमोकळ्या गप्पा माराव्यात, मनातली प्रत्येक गोष्ट तिला सांगावी असे सांगून सॅनिटरी नॅपकिन कसे वापरावे याविषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर प्रत्येक विद्यार्थिनीला सॅनिटरी नॅपकीनचे वाटप करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, शिक्षक व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

## शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा व कौतुक सोहळा

अमरदीप बालविकास फाउंडेशन व पुणे विद्यार्थी गृहाचे विद्याभवन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १ सप्टेंबर २०२४ रोजी इ. ५वी व इ. ८वी या वर्गाच्या (इंग्रजी व मराठी माध्यम) शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. अमरदीप बालविकास फाउंडेशनचे संस्थापक एन. डी. खान व कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांच्या शुभहस्ते गणेश पूजन व सरस्वती पूजन करण्यात आले. अतिथींचे स्वागत व सत्कार करण्यात आला. अमरदीप बालविकास फाउंडेशन तर्फे श्री. दिनेश मिसाळ तसेच मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ यांना सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. फेब्रुवारी २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवत्ताधारक १९ विद्यार्थ्यांना चषक देऊन गौरविण्यात आले. श्री. एन. डी. खान यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शाळेबद्दल गौरवोद्गार काढले व स्पर्धा परीक्षेचे महत्त्व विशद केले. पुणे विद्यार्थी गृह ही संस्था नेहमीच शैक्षणिक कार्यात सहकार्य करत असते असे सांगून विद्यार्थ्यांना सदिच्छा दिल्या. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी आपल्या भाषणातून अमरदीप बालविकास फाउंडेशनच्या कार्याचे कौतुक केले व आपले सहकार्य आम्हाला कायम मिळावे या भावना व्यक्त केल्या. त्यानंतर प्रत्यक्ष अध्यापनाचे वर्ग सुरू झाले. गणित विषय तज्ज्ञ श्री. उध्दव कदम तर बुद्धिमत्ता विषयाचे तज्ज्ञ श्री. राजाराम पवार यांनी विद्यार्थ्यांना मागर्दशन केले. विविध युक्त्या सांगून उदाहरणे अचूक व जलदगतीने कशी सोडवावी हे समजावून सांगितले.

## गुरूवर्य डॉ. अण्णासाहेब खैर यांची पुण्यतिथी

दि. २९ ऑगस्ट २०२४ रोजी विद्याभवन शैक्षणिक संकुलात गीतामहर्षी डॉ. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर यांच्या पुण्यतिथी निमित्त मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, श्रीमती श्रीजा नायर, श्रीमती मनिषा मुळीक, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक, पर्यवेक्षक, सर्व विभागांचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते डॉ. अण्णासाहेब खैर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. श्रीमती मेघाराणी जोशी यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. श्रीमती आरती औचर, श्रीमती पौर्णिमा खरजे, श्रीमती प्रीती दाभाडे, श्रीमती प्रतिभा कुमकर, श्री. सुजय वाबळे इ. शिक्षकांनी आपल्या भाषणातून अण्णांबद्दल माहिती सांगितली. अण्णांचे शैक्षणिक समाजिक कार्य अण्णांचे विचार आपल्या भाषणातून व्यक्त केले. अण्णांचा पूर्ण जीवनपटच शब्दांतून मांडण्यात आला. अण्णा म्हणजे सद्‌गुणांची खाण. प्रत्येकाने अण्णांचा एक तरी गुण अंगी जोपासावा हीच खरी अण्णांना आदरांजली होईल, असे सांगून श्रीमती नूतन गवांदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## आनंददायी शनिवार अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी जादूचे प्रयोग

दि. ३१ ऑगस्ट २०२४ रोजी हॅटसन या कंपनीतर्फे विद्यार्थ्यांसाठी जादूचे प्रयोग व टिफिन बॉक्सचे वाटप या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हॅटसन कंपनीच्या मार्केटिंग विभागाच्या प्रमुख श्रीमती वर्षा पाटील, त्यांचे सहकारी श्री. कार्तिक लिस तसेच जादूगार श्री. श्याम हे या कार्यक्रमास उपस्थित होते. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांच्या हस्ते अतिथींचे स्वागत व सत्कार करण्यात आला. श्री. श्याम यांनी मुलांसाठी वेगवेगळ्या अनोख्या पद्धतीने सुंदर असे जादूचे प्रयोग सादर केले. सर्व विद्यार्थ्यांना मोफत जेवणाचा डबा वितरीत करण्यात आला.

## वाचन महोत्सवानिमित्त विविध उपक्रम

दि. २६ ऑगस्ट २०२४ ते ३१ ऑगस्ट २०२४ या दरम्यान वाचन महोत्सवानिमित्त विविध उपक्रम आयोजण्यात आले. विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी, सर्वांगीण विकास व्हावा, वाचनाचे साहित्य व साहित्यिकांची ओळख व्हावी या उद्देशाने विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम घेण्यात आले. शालेय ग्रंथालयातून विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे पुस्तक देण्यात आले. पुस्तकाचे वाचन झाल्यानंतर त्या पुस्तकाबद्दलचे ‘माझे मत’ या विषयावर लेखन स्पर्धा घेण्यात आली. या लेखन स्पर्धेत इ. ३री ते ७वीच्या सर्व विद्यार्थ्यांनी भाग घेतला. प्रत्येक विद्यार्थ्याचे लेखन तपासून गुणदान करून ते शासकीय वेबसाईटवर अपलोड करण्यात आले. गटातून प्रथम तीन क्रमांक काढण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्याला आवडणाऱ्या पुस्तकाबद्दलचे मत व्हिडिओ व ऑडिओ स्वरूपातही सादर केले. दि. ३० ऑगस्ट २०२४ रोजी ग्रंथालयात विविध पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले. प्रेरणादायी पुस्तके, कथा, कादंबऱ्या इ. साहित्य त्यात मांडण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीची पुस्तके वाचली. या पुस्तक प्रदर्शनाला कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, शिक्षक व विद्यार्थ्यांनी भेट दिली.

## शाडूच्या मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनविणे कार्यशाळा

दि. ३ सप्टेंबर २०२४ रोजी विद्याभवन प्राथमिक मराठी विभागात पर्यावरणपूरक उपक्रम घेण्यात आला. शाडूच्या मातीपासून गणेशमूर्ती बनविण्याची कार्यशाळा घेण्यात आली. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांच्या शुभहस्ते श्री गणेशाचे पूजन करून कार्यशाळेचा शुभारंभ करण्यात आला. श्री गणपती स्तोत्राचे पठण करून मंगलमय वातावरणात कलाशिक्षक श्री. शील गमरे व श्रीमती अमृता झोडपे यांनी प्रात्यक्षिकासह मूर्ती कशी बनवावी हे सांगितले. पर्यावरणपूरक गणेश मूर्तीचे फायदे समजावून सांगितले. निसर्गाचा समतोल राखला पाहिजे याची जाणीव करून देण्यात आली. विद्यार्थ्यांनी

आपल्या हाताने खूपच सुंदर, आकर्षक, कलात्मक अशा गणेशाच्या मूर्ती साकारल्या.

**शिक्षक सन्मान सोहळा**

भारताचे दुसरे राष्ट्रपती व शिक्षण तत्त्वज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून नेरुळ येथील तेरणा दंत महाविद्यालयात संदीप नाईक प्रतिष्ठान तर्फे 'शिक्षक सन्मान सोहळा २०२४' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी माजी आमदार श्री. संदीप नाईक, माजी महापौर श्री. जयवंत सुतार तसेच श्री. रविंद्र इथापे, नवी मुंबई महामंत्री नेत्रा शिर्के तसेच अनेक आजी-माजी नगरसेवक, पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, तसेच कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ उपस्थित होते. शिक्षक हे देशाचे भविष्य घडविणारे असतात. त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. शैक्षणिक क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या शिक्षकांना सन्मानित करण्यात आले. प्राथमिक मराठी विभागातून मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा दिनेश मिसाळ यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. श्रीमती कविता तेंडुलकर आणि श्रीमती नूतन गवांदे यांना सन्मानचिन्ह व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. शिक्षण क्षेत्रात विशेष प्रेरणादायी कार्य म्हणून श्रीमती नूतन गवांदे यांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४' देऊन गौरविण्यात आले.

**शिक्षकांचा सन्मान**

विजय नाहटा फाउंडेशनतर्फे शिक्षक दिनाचे औचित्य साधून दि. ४ सप्टेंबर २०२४ रोजी विद्याभवन संकुलात शिक्षकांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी विजय नाहटा फाउंडेशनचे अध्यक्ष व शिवसेना उपनेते, माजी सनदी अधिकारी, माजी नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त श्री. विजयजी नाहटा साहेब तसेच शहर प्रमुख विजय माने व इतर सहकारी उपस्थित होते. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी मान्यवरांचे स्वागत व सत्कार केला. आपल्या भाषणातून त्यांनी श्री. नाहटा यांच्या समाजसेवेविषयी व आपल्या संस्थेला त्यांच्या होणाऱ्या सहकार्याविषयी माहिती दिली. विद्यार्थ्यांसाठी व शिक्षकांसाठी देखील त्यांचे सहकार्य नेहमी आपल्याला लाभो अशा भावना व्यक्त केल्या. शिक्षकदिनाच्या शुभेच्छा दिल्या. श्री. विजयजी नाहटा यांनी विद्यार्थी व शिक्षकांना मार्गदर्शन केले. शिक्षक हे ज्ञानदानाचे पवित्र कार्य करतात, त्यांचा आदर ठेवा, शिक्षकांनी देखील विद्यार्थी घडविण्याचे कार्य प्रामाणिकपणे करावे, शिक्षक हा समाज परिवर्तनाचा महत्त्वाचा घटक आहे, असे सांगून सर्व शिक्षकांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. श्री. विजयजी नाहटा साहेब यांच्या हस्ते सर्व शिक्षकांना डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे आत्मचरित्र 'अग्निपंख' पुस्तकरुपी भेट देऊन सन्मानित करण्यात आले.

**शिक्षक दिन**

विद्याभवन शैक्षणिक संकुलात ५ सप्टेंबर २०२४ रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून नवी मुंबईतील लायन्स क्लबचे सर्व पदाधिकारी आणि आर्ट ऑफ लर्निंगच्या सहाय्याने शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी लायन्स क्लब जिल्हा प्रशासक संजीव सूर्यवंशी, प्रवीण सरनाईक, चार्टर्ड प्रेसिडेंट प्रताप मुदलियार, कीर्ती सूर्यवंशी, नमिता मिश्रा, रीना अग्रवाल व त्यांचे सहकारी उपस्थित होते. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, सर्व विभागांचे मुख्याध्यापक श्रीमती सुवर्णा मिसाळ, श्रीमती श्रीजा नायर, श्रीमती मनिषा मुळीक, श्री. गोरख कदम, समन्वयक पांडुरंग मुळीक, पर्यवेक्षिका श्रीमती अस्मिता सलगर, सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते. विद्याभवन शैक्षणिक संकुल गेल्या २४ वर्षात शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात अद्वितीय अशी कामगिरी करत असून यामागे या संकुलातील मुख्याध्यापक, शिक्षकांसह प्रत्येक घटकाचे मोठे योगदान आहे. त्यासाठी आर्ट ऑफ लर्निंगच्या सहाय्याने लायन्स क्लब ऑफ नवी मुंबई चॅम्पियन्सच्या पदाधिकाऱ्यांनी सर्व शिक्षकांचे कौतुक केले. सर्व मुख्याध्यापकांना व शिक्षकांना, 'शिक्षक रत्न' प्रमाणपत्राने सन्मानित केले. यावेळी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा देखील सन्मान करण्यात आला. प्राथमिक मराठी विभागाच्या

विद्यार्थ्यांनी सामूहिक योगासन प्रात्यक्षिके सादर केली. सर्व उपस्थितांना लायन्स क्लबतर्फे अल्पोपहार देण्यात आला. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनीही सर्व शिक्षकांना श्रीफळ देऊन सन्मानित केले. विद्याभवन संकुलात शिक्षकांसह प्रत्येक घटकाचे अनमोल असे कार्य आहे, असे सांगत शिक्षकांबद्दल आदर व्यक्त करत सर्वांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी इ. ७वीचे विद्यार्थी शिक्षक बनले. पूर्व-प्राथमिक ते सातवीपर्यंतच्या वर्गावर या विद्यार्थी शिक्षकांनी अध्यापनाचे कार्य करून शिक्षक दिन साजरा केला.

**साक्षरता सप्ताह**

दि. ८ सप्टेंबर हा जागतिक साक्षरता दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून दि. १ सप्टेंबर २०२४ ते ८ सप्टेंबर २०२४ या काळात 'साक्षरता सप्ताह' साजरा करण्यात आला. या दरम्यान उल्हास नव भारत साक्षरता कार्यक्रम घेण्यात आला. साक्षरतेचा प्रचार व प्रसार होण्यासाठी पालकांच्या भेटी घेऊन त्यांना साक्षरतेचे महत्त्व सांगण्यात आले. उल्लास या ॲपवर त्यांची नोंदणी करण्यात आली. साक्षरतेचे महत्त्व पटवून देणारे बॅनर बनवून प्रभातफेरी काढण्यात आली. 'सारे साक्षर होऊ या, नव भारत घडवू या', असा संदेश देणारे पथनाट्य सादर करण्यात आले. साक्षरतेवर आधारित रांगोळी, चित्रकला, गीत गायन यांसारख्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना सन्मानित करून साक्षरता सप्ताहाची सांगता करण्यात आली.

**सांस्कृतिक कलादर्पण कलागुण स्पर्धा सुयश**

सांस्कृतिक कलादर्पण संस्थेमार्फत आंतरशालेय चौफेर विविध कलागुण नैपुण्य स्पर्धा रविवार दि. १ सप्टेंबर २०२४ रोजी बेडेकर कॉलेज, ठाणे येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेत विद्याभवन प्राथमिक मराठी विभागातील इ. १ली ते इ. ७वी च्या अनेक विद्यार्थ्यांनी वक्तृत्व, वेशभूषा, गीतगायन व नृत्य अशा विविध स्पर्धेत उत्स्फूर्त भाग घेतला व घवघवीत यश संपादन केले. पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांची नावे खालील प्रमाणे

| विद्यार्थ्याचे नाव | स्पर्धा | क्रमांक |
|---|---|---|
| कु. आर्या सुषमा अबगुल | नृत्य | प्रथम |
| कु. वृद्धी विकास वीर | वेशभूषा | प्रथम |
| कु. निहारिका प्रबोध फडके | वेशभूषा | द्वितीय |
| कु. वृद्धी विलास वीर | नृत्य | द्वितीय |
| कु. आरुषी मळेकर | वक्तृत्व | द्वितीय |
| | वेशभूषा | उत्तेजनार्थ |
| कु. काव्या कातळे | वक्तृत्व | प्रथम |
| कु. उल्का राजेश झगडे | वक्तृत्व | द्वितीय |
| | वेशभूषा | उत्तेजनार्थ |
| कु. रुद्र निलेश कातळे | गीत गायन | उत्तेजनार्थ |
| कु. नक्षत्रा मंगेश डाखोरे | नृत्य | उत्तेजनार्थ |
| कु. जिविका कल्पेश गावंड | नृत्य | उत्तेजनार्थ |
| कु. अनिक हेमंत पिसे | वेशभूषा | उत्तेजनार्थ |
| कु. विहान प्रणय पडवळ | वक्तृत्व | उत्तेजनार्थ |
| कु. दुर्वांकुर अमोल मळेकर | वेशभूषा | उत्तेजनार्थ |
| | वक्तृत्व | उत्तेजनार्थ |
| कु. संस्कृती विश्वनाथ राक्षे | वक्तृत्व | उत्तेजनार्थ |
| कु. माही राकेश माने | नृत्य | उत्तेजनार्थ |
| कु. करण किशोर रोकडे | गीतगायन | उत्तेजनार्थ |

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेच्या व संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा!**

**हिंदी दिवस**

दि. १४ सप्टेंबर २०२४ रोजी विद्याभवन प्राथमिक मराठी विभागात हिंदी दिवस साजरा करण्यात आला. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेचे महत्त्व सांगणाऱ्या कविता सादर केल्या. राष्ट्रभाषा हिंदीची निर्मिती कशी झाली हे कु. वेदश्री राक्षे हिने आपल्या भाषणातून सांगितले. ग्रंथालयात हिंदी भाषिक पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीचे हिंदी भाषिक पुस्तक वाचले. आज दिवसभर फक्त आणि फक्त हिंदी भाषेतच सर्वांनी बोलायचे असे ठरवून मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ यांनी हिंदी दिनाच्या शुभेच्छा दिल्या. ***

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ-नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय गुंजाळ**

**मुख्याध्यापिका : सौ. मनीषा साठे**

## पूर्व प्राथमिक मराठी

### बैलपोळा साजरा

दि. २ सप्टेंबर २०२४ रोजी ''बैलपोळा'' सण उत्साहात साजरा करण्यात आला. प्रत्येक माणसाने शेतीसाठी उपयोगी पडणाऱ्या बैल या प्राण्याचा आदर केला पाहिजे, हे पोळा सण आपल्याला शिकवतो. या दिवशी सर्व विद्यार्थ्यांनी रंगीबेरंगी आणि सजवलेले बैल आणले होते. विद्यार्थ्यांनी वेगवेगळे पोशाख घातले होते.

कार्याक्रमाची सुरूवात 'नंदी' प्रदर्शनाच्या उद्घाटनाने झाली. मुख्याध्यापिका सौ. मनीषा साठे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांनी यावेळी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. बैलपोळा या सणाच्या दिवशी मोठ्या गटाच्या विद्यार्थ्यांनी बैलांप्रती व शेतकऱ्यांप्रती कृतज्ञता वाहण्यासाठी शेतकरी बांधवांचा पोशाख घातला होता. यावेळी शिक्षकांनी शेतकरी आणि बैलांचे शेतीतील काम समजावून सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांनी बैलांवर एक सुंदर गीत गायन केले. एकूणच कार्यक्रम खूप आनंदाने आणि उत्साहात पार पडला.

### फिल्ड व्हिजिट आयोजन

फिल्ड व्हिजिट अंतर्गत एका बेकरीला भेट देण्यात आली. बेकरीसारख्या स्वादिष्ट ठिकाणी जाऊन विद्यार्थी खूप उत्साहित झाले. यावेळी त्यांना बेकरी उत्पादनांची माहिती देण्यात आली. स्वयंपाक घरात वापरली जाणारी सर्व भांडी तसेच बेकर्स केक बनवण्यासाठीचे ओवन दाखवण्यात आले. किचनमध्ये वापरल्या जाणाऱ्या वस्तू, त्यांच्या स्वयंपाकघरात स्वच्छता कशी राखली जाते, हे देखील विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. शेवटी विद्यार्थ्यांना स्वादिष्ट पेस्ट्री देखील देण्यात आल्या. या सहलीचा मुख्य उद्देश, विद्यार्थ्यांना बेकरी विभागात प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी प्रोत्साहित करणे आणि बेकरीमध्ये वापरल्या जाणाऱ्या बेकिंग प्रक्रियेची आणि भांड्यांची ओळख करून देणे हा होता. विद्यार्थ्यांनी या फिल्ड व्हिजिटचा पुरेपूर आनंद घेतला. ही व्हिजिट कार्यवाह श्री. संजय गुंजाळ आणि मुख्याध्यापिका सौ. मनीषा साठे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि बेकरी व्यवस्थापक व कामगार यांच्या सहकार्याने पार पडली.

### गो ग्रीन म्हणजेच हिरवा दिवस साजरा

हिरवा हा जीवनाचा, निसर्गाचा, वाढीचा आणि समृद्धीचा मुख्य रंग आहे. पुणे विद्यार्थी गृहाच्या पूर्व प्राथमिक विभागाने झाडे वाचवण्याचे, वचन घेऊन हिरवा दिवस साजरा केला. हिरवा दिवस साजरा करण्यामागील मुख्य उद्देश म्हणजे पृथ्वीबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि आपल्याला लाभलेल्या हिरवाईचे जतन करणे हा होता. यावेळी शिक्षक तसेच चिमुकल्यांनी हिरवे पोशाख परिधान केले होते. विद्यार्थ्यांनी त्यांच्या वर्गशिक्षिका आणि मुख्याध्यापिका सौ. मनीषा साठे यांच्यासोबत रोपांना उत्साहाने पाणी घातले.

विद्यार्थ्यांनी त्यांच्या कल्पनांप्रमाणे रंग आणि कोलाजचे काम देखील केले. मुख्याध्यपिका सौ. मनीषा साठे यांनी हिरवा रंग आणि निसर्ग यांचे महत्त्व आणि समन्वय कसा साधावा, लहान मुलांना पृथ्वी मातेची काळजी घेण्याचा सल्ला दिला आणि प्रेरित केले. कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली हिरवा दिवस साजरा झाला.

### आजी-आजोबा दिवस साजरा

आजी-आजोबा जे करतात ते लहान मुलांसाठी कोणीही करू शकत नाही. आजी आजोबा म्हणजे कुटुंबाचा सर्वात मोठा खजिना. आजी आजोबा कुटुंबाचा सर्वात मजबूत पाया असतो. नातवंडांच्या विशेष प्रेमामुळे आणि काळजीमुळे, आजी आजोबा त्यांना मनापसून जवळ ठेवतात. त्यांचा सन्मान

करण्यासाठी 'आजी-आजोबा दिन' खूप आनंदाने आणि उत्साहाने साजरा करण्यात आला. याप्रसंगी मुख्याध्यापिका सौ. मनीषा साठे यांनी उपस्थितांचा सन्मान केला. तसेच समाजातील आजी आजोबांच्या भूमिकेचे कौतुक केले. नर्सरी, लहान गट आणि मोठ्या गटाच्या मुलांनी त्यांच्या आजी-आजोबांसाठी गाण्यांच्या मधुर सुरांवर धमाल नृत्य सादर केले. आजी आजोबांनी या उत्सवाच्या माध्यमातून पिढ्यांमध्ये सबंध जोडण्यासाठी मांडलेल्या विचारांचे व प्रयत्नांचे कौतुक केले. शाळेने आयोजित केलेल्या बाल गेम, रिंग गेम, हिप हॉप डान्स, हास्ययोगा इत्यादी कार्यक्रमांमध्ये आजी-आजोबांनी मनापासून सहभाग घेतला. ***

## * डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ–नाशिक *



''बैलपोळा'' सण साजरा करताना पूर्व प्राथमिक विभागाचे विद्यार्थी



गो ग्रीन - हिरवा दिवस साजरा करताना पूर्व प्राथमिक विभागाचे विद्यार्थी



''आजी - आजोबा दिन'' साजरा करताना पूर्व प्राथमिक विभागाचे विद्यार्थी



फिल्ड व्हिजिट अंतर्गत बेकरी भेट प्रसंगी विद्यार्थी

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ–नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय गुंजाळ**

**मुख्याध्यापिका : सौ. प्रतिमा वैद्य**

## प्राथमिक विभाग

### बैल पोळा

शेतकरी राजाचा सण असलेला बैल पोळा हा सण उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्त मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांनी बैलाची पूजा केली. शिक्षिका सौ.अरसुले यांनी पोळा या सणाविषयी विद्यार्थ्यांना माहिती सांगितली.

### चिन्मय गीता पठन

दि. ३ सप्टेंबर २०२४ रोजी शाळेत 'भगवत्‌गीता श्लोक पठण' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे परीक्षण सौ. सुजाता तुलांगेकर व सौ. वैशाली गोसावी यांनी केले. यशस्वी विद्यार्थ्यांची नावे पुढील प्रमाणे -

**इयत्ता ३ री व ४ थी**

कु. आरुषी संकोपाल कु. आर्या वाघ

**इयत्ता ५वी व ६ वी**

कु. शर्वरी व्यवहारे कु. आरोही वाघ

कु. तन्वी दवंगे कु. रिद्धी आहेर

### भारत टॅलेंट सर्च परीक्षा

दि. ३ सप्टेंबर २०२४ रोजी भारत टॅलेंट सर्च परीक्षेचा निकाल जाहीर झाला. विद्यार्थी कु. मितेश देशमुख, इ. ६ वी हा राज्य गुणवत्ता यादीत १२ वा तर जिल्हा यादीत दुसरा आला आहे.

### शिक्षक दिन

दि. ५ सप्टेंबर २०२४ रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य आणि पालक शिक्षक संघाच्या सदस्यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन केले. शाळेतील विद्यार्थ्यांनी शिक्षकांबद्दल आदर आणि कृतज्ञता व्यक्त केली. शिक्षिका सौ. शुभांगी देशमुख यांनी विद्यार्थ्यांना शिक्षक दिनाचे महत्त्व सांगितले.

यानंतर पालक शिक्षक संघाच्या सदस्यांनी शाळेतील शिक्षकांचा गुलाबपुष्प देऊन सत्कार केला. पालक शिक्षक संघाच्या सदस्यांनी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची प्रतिमा शाळेला भेट म्हणून दिली. पुणे विद्यार्थी गृह म्हसरूळ शाखेतर्फे शिक्षकांना भेटवस्तू देण्यात आल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इ. ७ वी च्या विद्यार्थिनींनी केले.

### चक्रधर स्वामी जयंती

दि. ५ सप्टेंबर २०२४ रोजी महानुभव पंथाचे संस्थापक श्री. चक्रधर स्वामी यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. शिक्षिका सौ. पूजा देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना चक्रधर स्वामी यांच्याविषयी माहिती सांगितली.

### साक्षरता दिन

दि. ८ सप्टेंबर २०२४ रोजी जागतिक साक्षरता दिन साजरा करण्यात आला. जागतिक साक्षरता दिनाचे महत्त्व शिक्षिका सौ माधुरी गवळी यांनी सांगितले.

### हिंदी वक्तृत्व स्पर्धा

हिंदी दिनानिमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षिका सौ. रेखा जंजाळ यांनी विद्यार्थ्यांना हिंदी दिनाचे महत्त्व सांगितले. हिंदी वक्तृत्व स्पर्धेचे विषय पुढीलप्रमाणे -

| इयत्ता | विषय |
|---|---|
| ४ थी | १) वन और पर्यावरण |
| | २) प्रदूषण की समस्या |
| ५ वी | १) मेरा विद्यालय मेरी पहचान |
| | २) परिश्रम की परिभाषा |
| ६वी | १) समय बडा बलवान |
| | २) स्वस्थ जीवनशैली |
| ७ वी | १) विदेशी आकर्षण |
| | २) मानव जीवन मे गुरु का महत्त्व |

**यशस्वी विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे**

**इयत्ता ४ थी व ५ वी गट**

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | हाऊस |
|---|---|---|
| कु. रिया जाधव | ५ वी | गुलमोहर |
| कु. प्राची वाघेरे, | ४ थी | सफायर |
| कु. अर्णव खालकर | ४ थी | ओपल |

**इयत्ता ६ वी व इ. ७ वी गट**

| | | |
|---|---|---|
| कु. समृद्धी मोराडे | ७ वी | पृथ्वी |
| कु. यश बिंदू | ७ वी | पृथ्वी |
| कु. दुर्वांकुर कोळंबे | ६ वी | विक्रांत |

**कराटे स्पर्धा**

दि. १५ सप्टेंबर २०२४ रोजी गोदावरी पब्लिक स्कूल यांचे तर्फे कराटे स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत सहभागी झालेल्या २१ विद्यार्थ्यांनी पदके मिळवली.

**शाडूमाती संकलन निसर्गायन**

निसर्गायन मोहिमेअंतर्गत 'मी शाडू माती रक्षक' या कार्यक्रमाद्वारे गणेशमूर्तीचे विसर्जन घरी करून त्याची पोटली बनवून ती शाळेत जमा केली. या पोटलीचा म्हणजेच शाडू मातीचा पुनर्वापर करण्यासाठी कारागिराकडे देण्यात येते. दि. २१ व २२ सप्टेंबर २०२४ रोजी शाडू मातीचे संकलन करण्यात आले.

**ओझोन दिन**

दि. १८ सप्टेंबर २०२४ रोजी ओझोन दिवस साजरा करण्यात आला. इ. ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांनी ओझोन थर संरक्षणावर घोषवाक्य लिहिली. शिक्षिका सौ. सोनाली जोशी यांनी विद्यार्थ्यांना ओझोन थराचे महत्त्व सांगितले

**अभिनंदनीय**

दि. २० सप्टेंबर २०२४ रोजी कालिदास कलामंदिर येथे बाल कलाकारांसाठी बाल रंगभूमी तर्फे विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. बाल कलाकारांचा गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळाला. विद्यार्थ्यांनी समूहगीत व नृत्याविष्कार यामध्ये सहभाग घेतला. पारंपरिक समूहगीत स्पर्धेत शाळेला प्रशंसनीय व उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. शाळेला सन्मानचिन्ह आणि विद्यार्थ्यांना पारितोषिक मिळाले.

**पर्यटन दिन**

दि. २७ सप्टेंबर २०२४ रोजी पर्यटन दिन साजरा करण्यात आला. शिक्षिका सौ. वैशाली मुंदाणकर यांनी विद्यार्थ्यांना पर्यटनाची माहिती व महत्त्व सांगितले.

**पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंती**

पंडित दीनदयाळ उपाध्याय राजकीय नेते होते. त्यांचा जन्म २९ सप्टेंबर १९१६ रोजी झाला. त्यांच्या कार्याची माहिती शिक्षिका सौ. रत्ना गोसावी यांनी विद्यार्थ्यांना दिली.

**इंग्रजी निबंध स्पर्धा**

दि. २८ सप्टेंबर २०२४ रोजी इंग्रजी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. इयत्ता ४ थी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. इंग्रजी निबंध स्पर्धेचे विषय पुढीलप्रमाणे

| इयत्ता | विषय |
|---|---|
| ४ थी | १) My pet Animal |
| | २) Autobiography of bag |
| ५ वी | १) Importance of Reading |
| | २) A Memorable Holiday |
| ६ वी | १) Culture Heritage of India |
| | २) The Role Human Activity in Natural Disaster |

**स्पर्धेचे विजेते पुढीललप्रमाणे**

**इयत्ता ४ थी व ५ वी गट**

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | हाऊस |
|---|---|---|
| कु. तन्वी प्रशांत दवंगे | ५ वी | गुलमोहर |
| कु. स्नेहा अनिल प्रसाद | ५ वी | पारिजात |
| कु. तोशिका तुषार कुशारे | ४ थी | ओपल |

## फॅन्सी ड्रेस स्पर्धा

दि. २८ सप्टेंबर २०२४ रोजी इ. १ ली ते ३ री साठी फॅन्सी ड्रेस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सर्व विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून पालक शिक्षक संघाच्या सदस्या सौ. श्रद्धा बाग व सौ. सोनल धात्रक यांना निमंत्रित करण्यात आले होते.

| इयत्ता | विषय |
|---|---|
| १ ली | १) Disney Characters |
| | २) World book theme |
| २ री | १) Health and Junk food |
| ३ री | १) Unity in Diversity |
| | २) Means of Communication |

**स्पर्धेचे विजेते खालीलप्रमाणे**

| इयत्ता | विद्यार्थ्याचे नाव | हाऊस |
|---|---|---|
| १ ली | कु. शिवन्या बापूराव शिंदे | ऑरेंज |
| | कु. साची शैलेश वेलानी | मॅगो |
| | कु. शिवांश हनुमंत काळे | मॅगो |
| २ री | कु. मिष अशोककुमार बडूस | ग्रेप्स |
| | कु. दृष्टी राकेश सूर्यवंशी | चेरी |
| | कु. कृष्णिका ज्ञानेश्वर सोनवणे | पाइनॅपल |
| ३ री | कु. सिया विजय साळवे | डायमंड |
| | कु. आर्या अतुल वाघ | क्रिस्टल |
| | कु. जय तुषार बाफना | पर्ल |

***

**✻ डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ–नाशिक ✻**



← कराटे स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी




शाडूमाती संकलन निसर्गायन अंतर्गत गणेशमूर्तींचे विसर्जन घरी करून पुनर्वापर करण्यासाठी शाडू मातीचे संकलन करताना विद्यार्थिनी



पारंपरिक समूहगीत स्पर्धेत सहभाग घेऊन शाळेला प्रशंसनीय व उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवून देणाऱ्या विद्यार्थिनींचा चमू

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ–नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय गुंजाळ**
**मुख्याध्यापिका : श्रीमती भारती पाटील**

**माध्यमिक विभाग**

शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरूवात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी भाषणे, तसेच नृत्य इ. सादर केले. सर्व शिक्षकांनी मुलांना मार्गदर्शन केल्याबद्दल विद्यार्थ्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाच्या काही निवडक विद्यार्थ्यांनी विविध शिक्षकांची भूमिका केली, तसेच विविध विषय शिकवले. शालेय व्यवस्थापनेचे कामकाज अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडले. पालक शिक्षक संघाच्या अध्यक्षांनी मुख्याध्यापिका, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सत्कार केला.

**हिंदी राज्यभाषा दिन**

विद्यार्थ्यांमध्ये भाषिक कौशल्य विकासाच्या उद्देशाने दि. १४ सप्टेंबर रोजी हिंदी दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. इ. ८वीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून हिंदी भाषेचा इतिहास आणि हिंदी भाषेचे महत्त्व स्पष्ट केले. तसेच हिंदी साहित्याचा परिचय देत असताना प्रसिद्ध कवी, लेखक संत कबीर यांचे दोहे आठवीच्या मुलींनी गायले त्याचा अर्थही स्पष्ट केला. स्वामी विवेकानंदांची वेशभूषा परिधान करून त्यांच्या जीवनातील एक प्रसंग मुलांनी प्रस्तुत केला. त्यातून आपल्या भाषेचा अभिमान तर करायचा, पण दुसऱ्या भाषेचा अपमान धरायचा नाही संदेश दिला. हिंदीच्या शिक्षिकेने आपण हिंदी विषय का शिकतो, याची माहिती सांगून हिंदीला राज्य भाषेचा दर्जा का दिला गेला याची माहिती सांगितली.

**विज्ञान प्रदर्शनात सर्जनशीलतेच्या स्पर्शाने उचललेले इनोव्हेटिव्ह माइंडस**

इ. ८वी ते १०वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या नावीन्यपूर्ण कलागुणांचे प्रदर्शन करणारे विज्ञान प्रदर्शन यावेळी आयोजित केले.

या प्रदर्शनात स्मार्ट सिटी, शाश्वत विकासासाठी हरित ऊर्जा आणि भौतिक शास्त्राच्या तत्त्वावर आधारित कार्यरत मॉडेल्स या सारख्या महत्त्वाच्या विषयावर विचार करायला लावणारे प्रकल्प सादर करण्यात आले.

या प्रदर्शनाचे परीक्षक श्री. गणेश बागूल मराठी विद्या परिषदेचे समन्वयक डॉ. अरविंद जिंजर आणि पीव्हीजीच्या बीएड् महाविद्यालयातील प्रा. दिलीप अहिरे यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक शोध आणि नवोपक्रमासाठी केलेल्या समर्पणाबद्दल कौतुक केले.

इव्हेंटचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे इ. १०वी मधील येलो हाऊस विजयी झाले. त्यांचे भौतिकशास्त्राच्या तत्त्वावर आधारित कार्य मॉडेल त्यांच्या कल्पतेसाठी आणि व्यवहारिक अनुप्रयोगासाठी वेगळे होते. मुख्याध्यापिका यांनी विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे व सर्जनशीलतेचे कौतुक केले.

**अभिनंदनीय**

शालेय योगासन स्पर्धेत कु. पार्थ खताळ याने १७ वर्ष वयोगटात जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविला. कु. पार्थ खताळ याची राज्यस्तरावर निवड झाली आहे. कु. आदित्य खरे, (इ. १०वी) याने गोळाफेकीत तृतीय क्रमांक प्राप्त केला.



कु. पार्थ खताळ



कु. आदित्य खरे


कु. चिन्मय पाटील

कु. चिन्मय पाटीलने शिर्डी येथे झालेल्या ११ टॅग सुडो मार्शल आर्ट राज्यस्तरीय स्पर्धेत U-१८-५२ वजनगटात गोल्ड मेडल जिंकले तर महाराष्ट्र कराटे असोसिएशनच्या राज्यस्तरीय स्पर्धेत बालेवाडी पुण्यात U-१५-५२ कि. वजनगटात सिल्व्हर मेडल मिळवले.

**कु. पार्थ खताळ, कु. आदित्य खरे आणि कु. चिन्मय पाटील यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

***

# अभियांत्रिकी व एस.एस.धामणकर व्यवस्थापन महाविद्यालय, म्हसरूळ, नाशिक

**कार्यवाह : संजय नि. गुंजाळ**

**प्राचार्य : डॉ. एम. व्ही. भालेराव**

### स्टार्टअप स्पर्धेतील विद्यार्थ्यांचे यश

आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डाटा सायन्स या विभागाच्या तृतीय वर्ष पदवीच्या विद्यार्थ्यांनी 'स्टार्टअप अरेना (STARTUP ARENA) आयडिया पिचिंग' या स्पर्धेत चतुर्थ क्रमांकाचे पारितोषिक मिळवले.

ई-सेल आय. आय. टी. बॉम्बेज नॅशनल एंटरप्रेनरशिप चॅलेंज - २०२४ व गुरू गोबिंद सिंघ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्टार्ट अप अरेना आयडिया पिचिंग या स्पर्धेत कु. मेहुल परदेशी, कु. दिव्येश माळी, कु. सिद्धेश राजळे या विद्यार्थ्यांनी चतुर्थ क्रमांकाचे स्थान मिळवून आय. आय. टी. बॉम्बे अंतर्गत होणाऱ्या युरेका झोनल स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र झाल्याची माहिती आयोजकांनी दिली. विद्यार्थ्यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

कु. मेहुल परदेशी, कु. दिव्येश माळी, कु. सिद्धेश राजळे या विद्यार्थ्यांचे कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, प्राचार्य डॉ. एम. व्ही. भालेराव आदींनी अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलचे अधिकारी, प्रा. आय. एस. सोनवणे व प्रा. एल. आर. पाटील आणि विभागप्रमुख, प्रा. एस. जी. चोरडिया (आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डाटा सायन्स) तसेच इतर प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले.

### महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त स्वच्छता मोहिम संपन्न

महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून स्वच्छ भारत अभियानाचे संयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य प्रा. डॉ. एम. व्ही. भालेराव, उपस्थित होते. तसेच या प्रसंगी सर्व विभाग प्रमुख डॉ. अमोल रासने, डॉ. शिवाजी गवळी, डॉ. सोनाली जाधव, प्रा. सतीश भदाणे, प्रा. जगदीश कापडणीस, प्रा. संकेत चोरडिया, अकॅडेमिक डीन प्रा. डॉ. योगिता अहिरे, प्लेसमेंट अधिकारी श्री. इंद्रजीत सोनवणे, विद्यार्थी कल्याण मंडळाचे प्रा. सुहास धारणे, ग्रंथपाल श्री. संदीप दराडे, प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थिनी कु. धनश्री पैठणे हिने केले. कार्यक्रमाविषयी माहिती कु. पार्थ सावळे याने दिली. यावेळी विद्यार्थी कल्याण मंडळ अधिकारी प्रा. सुहास धारणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. सर्वांनी प्लास्टिक कॅरी बॅग, थर्माकोल इत्यादी पर्यावरणास हानिकारक वस्तूंचा वापर न करण्याचा सल्ला दिला. तसेच आपला परिसर स्वच्छ ठेवण्याची सर्वांनी शपथ घेतली. 'जय जवान, जयकिसान आणि जय विज्ञान' हा नारा दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समन्वयक प्रा. शिवाली माळी आणि प्रा. योगिता मेधने यांनी केले. उपस्थितांचे आभार कु. विशाखा राजापुरे हिने मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री. निवृत्ती डावखर आणि दीपाली रायते यांनीही योगदान दिले.

***

## ✻ अभियांत्रिकी व एस.एस.धामणकर व्यवस्थापन महाविद्यालय, म्हसरूळ, नाशिक ✻




आयोजकांच्या हस्ते प्रमाणपत्र स्वीकारताना कु. मेहुल परदेशी, कु. दिव्येश माळी आणि कु. सिद्धेश राजळे



महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी उपस्थित प्राचार्य डॉ. एम. व्ही. भालेराव, विभाग प्रमुख, प्राध्यापक, सेवक आणि विद्यार्थी

## दुःखद निधन



अमरेंद्र प्रभाकर गोरे

संस्थेचे देणगीदार, सल्लागार मंडळाचे सदस्य, माजी पालक श्री. अमरेंद्र प्रभाकर गोरे यांचे रविवार दि. २० ऑक्टोबर २०२४ रोजी वयाच्या ७६ व्या वर्षी दुःखद निधन झाले. श्री. अमरेंद्र गोरे यांनी संस्थेस भरीव देणगी विविध - भोसले राजे घराणे, तसेच पेशवे. सेनापती, सरदार, गायक, वादक, समाजसुधारक, शास्त्रज्ञ, लेखक, कवी इ. चे स्मरणार्थ दिलेली आहे. श्री. अमरेंद्र गोरे यांचे व्यक्तिमत्त्व हे अतिशय सज्जन, दानशूर, प्रेमळ व मनमिळावू स्वभावाचे होते. त्यांचे निधनाने अतिशय दुःख झाले.

श्री. अमरेंद्र गोरे यांच्या पत्नी सौ. अनिता गोरे यांचेही दि. १३ ऑक्टोबर २०२४ रोजी दुःखद निधन झाले.

श्री. अमरेंद्र गोरे आणि त्यांच्या पत्नी सौ. अनिता गोरे या दोघांच्याही आत्म्यास चिरशांती आणि सद्‌गती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

✻✻✻

# कॉलेज ऑफ इंजिनिअरींग व टेक्नॉलॉजी आणि जी.के.पाटे (वाणी) व्यवस्थापन महाविद्यालय, पुणे

**संचालक : श्री. सुनील रेडेकर**

**संचालक : प्रा. राजेंद्र गो. कडुसकर**

### मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग

दि. ९ सप्टेंबर २०२४ रोजी 'पर्वती पंपिंग स्टेशन' येथे यांत्रिकी विभागाच्या फायनल वर्षाच्या विद्यार्थ्यांकरिता इंडस्ट्रिअल व्हिजिट आयोजित करण्यात आली. जे. एस. कुलकर्णी, जी. वी. मोरे आर. आर. आणि आर. आर. बडकस उपस्थित होते. दि. १४ सप्टेंबर २०२४ रोजी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांकरिता यांत्रिकी विभागातर्फे ओरिएंटेशन प्रोग्राम आयोजित करण्यात आला. यावेळी त्यांना प्रोजेक्ट इनोवेशन आणि रोबोटिक्स या लॅब दाखवण्यात आल्या. यांत्रिकी विभागात दि. २१ सप्टेंबर २०२४ रोजी अंतिम वर्षाच्या मुलांचे प्रोजेक्ट रिव्ह्यु आयोजित करण्यात आले. त्यासाठी इंडस्ट्री एक्स्पर्ट श्री. पृथ्वीराज खामकर, आशुतोष मोडक, ऋषभ शिंदे, थत्ते हे उपस्थित होते. विभागप्रमुख डॉ. एम. एम. भूमकर यांनी मार्गदर्शन केले. यांत्रिकी विभागात दि. २४ ते २७ सप्टेंबर २०२४ या कालवधीत तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांकरिता 'Spoken Tutorial', Python 3.4.3 या विषयाचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी विद्यार्थ्यांनी पूर्व-रेकॉर्ड केलेले व्हिडिओ ऐकले. यासाठी प्रा. रश्मी पाकणकर यांनी मार्गदर्शन केले आणि प्रा. गौरी बेडेकर व प्रा. एम. एम. कांबळे यांनी सहकार्य केले.

### इ अ‍ॅण्ड टी सी इंजिनिअरिंग विभाग

इ अ‍ॅण्ड टि सी विभागाद्वारे सुरू करण्यात आलेल्या 'डिफेन्स एरियल अनमॅनड सर्व्हिलन्स सेंटिनेल क्लब (DAUSS) चे उद्घाटन दि. २१ ऑगस्ट २०२४ रोजी झाले. DAUSS मानवरहित हवाई वाहन (UAV) तंत्रज्ञानामध्ये संशोधन, विकास आणि नवकल्पना यावर लक्ष केंद्रित करते, पाळत ठेवणे आणि संरक्षण क्षमता वाढवणे हे प्राथमिक उद्दिष्ट आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाची निर्मिती करण्यासाठी UAV क्लब प्रणाली, रेडिओ संप्रेषण, कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग आणि आधुनिक UAV च्या सर्व पैलूंमध्ये स्वारस्य असलेले विद्यार्थी आणि व्यावसायिकांना एकत्र आणतो. ब्रिगेडियर ए. पी. शारंगपाणी, सीओईपीचे माजी विद्यार्थी आणि आयसीटी आणि इलेक्ट्रॉनिक युद्ध प्रणालीतील तज्ञ, प्रमुख पाहुणे होते. त्यांनी भारतीय सैन्यात ३५ वर्षांहून अधिक सेवा केली आहे. उद्घाटन समारंभात संचालक श्री. सुनिल रेडेकर आणि प्रा. राजेंद्र कडुसकर, प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारंबळे, प्राध्यापक डॉ. प्रसन्ना जी. शेटे, डॉ. कल्याणी जे. कुलकर्णी, प्रा. दीप्ती टी. वर्पे, श्री. मुकुंद गिरगावकर, आणि त्यांच्या टीमने DAUSS क्रियाकलाप आणि भविष्यातील कृती योजनेबद्दल अंतर्दृष्टी सामायिक केली.

दि. २४ ऑगस्ट २०२४, KPIT टेक ट्रेझर हंट हा एक सहयोगी कार्यक्रम होता ज्याचा उद्देश सहभागींमध्ये टीमवर्क, सर्जनशीलता आणि तांत्रिक समस्या सोडवण्याची कौशल्ये वाढवणे हे होते. सहभागींना आव्हान देण्यासाठी आणि त्यांच्या क्षमतांचे प्रदर्शन करण्यासाठी, विविध वातावरणाचा वापर करण्यात आला. स्पर्धेत पाच संघांनी सहभाग घेतला. डॉ. पी.जी. शेटे, विभाग प्रमुख आणि आयआयसी समन्वयक यांनी सहभागींना संबोधित केले. त्यांच्या कामगिरीबद्दल आणि प्रयत्नांबद्दल त्यांचे अभिनंदन केले. पर्यावरणीय शाश्वततेसाठी कार्यक्रमाच्या वचनबद्धतेनुसार, विजेत्या संघाला कॅम्पसमध्ये वृक्षारोपण करून गौरविण्यात आले. KPIT टेक ट्रेझर हंटने नावीन्य, टीमवर्क आणि पर्यावरण जागरूकता वाढवण्याची आपली उद्दिष्टे यशस्वीरित्या साध्य केली. हा कार्यक्रम सर्वांसाठी संस्मरणीय आणि परिणामकारक झाला

महाविद्यालयामध्ये स्मार्ट इंडिया हॅकाथॉन (SIH २०२४) प्रक्रिया सुरू झाली. दि. २६ ऑगस्ट २०२४ रोजी आयोजित विद्यार्थ्यांसाठी अभिमुखता सत्र SIH २०२३ च्या विजेत्यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी समस्या विधानांबद्दल आणि Idea PPT बद्दल

मौल्यवान इनपुट दिले. स्मार्ट इंडिया हॅकाथॉन (SIH २०२४) साठी अंतर्गत हॅकाथॉन दि. ६ सप्टेंबर २०२४ रोजी महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात आली होती. प्रा. वैशाली गोंगाणे यांनी सिंगल पॉइंट ऑफ कॉन्टॅक्ट (SPOC) म्हणून काम केले. SIH २०२४ विद्यार्थी संघ नोंदणीची संख्या ४०, हार्डवेअर श्रेणीतील ७ समस्या विधाने आणि सॉफ्टवेअर श्रेणीतील ३३ समस्या विधाने संघांद्वारे निवडले गेले. अंतर्गत हॅकाथॉनचे ठिकाण लायब्ररी संदर्भ कक्ष आणि होते. टी ॲण्ड एन पी चर्चा केबिनसह पी हॉल हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर डोमेनमधील ७ उद्योग तज्ञांनी संघांचे मूल्यांकन केले आणि सूचना दिल्या आणि त्यांच्या कामात आणखी सुधारणा करण्यासाठी मार्गदर्शन केले. विविध विभागातील ७ शिक्षकांनी काम पाहिले.

दि. ३१ ऑगस्ट २०२४ रोजी आयोजित कार्यक्रमामध्ये माजी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ५१ नोंदणीकृत माजी विद्यार्थी. प्रा. एम. पी. पोतदार, डीन ॲकॅडेमिक्स यांनी माजी विद्यार्थ्यांचे स्वागत केले आणि माजी विद्यार्थ्यांच्या सतत सहभागाच्या महत्त्वावर जोर दिला. डॉ. पी. जी. शेटे, ई आणि टीसी विभागाचे प्रमुख, प्रमुख शैक्षणिक कामगिरीसह विभागाच्या प्रगतीचा आढावा घेतला. माजी विद्यार्थी संघटनेबद्दल, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष प्रा. व्ही. व्ही. सोवनी यांनी संघटनेची वाढ आणि योगदान यावर चर्चा केली. संचालक प्रा. राजेंद्र कडूसकर यांनी भविष्यातील विकास योजनांबद्दल माहिती सांगितली. प्रा. एन. डी. चौधरी आणि प्रा. एस. आर. लिटके यांनी NBA आणि NAAC उपक्रमांची माहिती दिली. माजी विद्यार्थ्यांनी त्यांचे अनुभव आणि पदवीनंतरच्या त्यांच्या प्रवासाबद्दल माहिती सांगितली. माजी विद्यार्थ्यांना फीडबॅक फॉर्म प्रदान केले गेले ज्यावर त्यांनी विभागाच्या सुधारणेसाठी मौल्यवान सूचना दिल्या. सर्व सहभागी, वक्ते आणि आयोजकांचे कृतज्ञता व्यक्त करून प्रा. व्ही. व्ही. सोवनी, माजी विद्यार्थी समन्वयक यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

इलेक्ट्रॉनिक्स आणि दूरसंचार विभागाने शनिवार दि. १४ सप्टेंबर २०२४ रोजी पालक सभेचे आयोजन केले होते. तृतीय वर्ष व चौथ्या वर्षातील विद्यार्थ्यांचे पालक ऑनलाइन पद्धतीने बैठकीत सहभागी झाले होते. विभागप्रमुख डॉ. प्रसन्न शेटे यांनी विभागातील विविध उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांची उपस्थिती, परीक्षा, इंटर्नशिप आणि प्लेसमेंटच्या मुद्यांवर बैठकीत चर्चा झाली. प्रा.निलेश कुचेकर यांनी आभार मानले.

दि. १४ सप्टेंबर २०२४ रोजी प्रथम वर्षाच्या अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी अभिमुखता कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात एचओडी, प्राध्यापक सदस्य आणि सर्व विद्यार्थ्यांचे प्रा.डी.टी.वर्पे यांनी स्वागत करून केली. डॉ.पी.जी. शेटे, प्रमुख  विभाग यांनी विद्यार्थ्यांचे संस्थेत स्वागत करून अभिनंदन केले. अभियांत्रिकीचे पैलू, विभागाची दृष्टी आणि ध्येय, गव्हर्नन्स सारखे विषय: शैक्षणिक आणि विद्यार्थ्यांचा विकास, विभाग हायलाइट्स, पायाभूत सुविधा एचओडी प्रामुख्याने लक्ष केंद्रित तसेच त्यांनी सर्व प्राध्यापकांची ओळखही करून दिली आहे. या प्रसंगी प्रा. महेश पी पोतदार, प्रा. एन. डी. कुचेकर, डॉ. वाय. बी. ठाकरे, प्रा. श्रीमती पी. एस. देशपांडे, डॉ. एस. आर. लिटके, प्रा. सौ. व्ही. व्ही. सोवनी , प्रा. आर. के. पाटील, प्रा. जी. ए. कुलकर्णी, प्रा. एम. एच. बेलसरे, प्रा. टी. एस. खटावकर, प्रा. वाळके, प्रा. के. सी. वंजारे, प्रा. एस. व्ही. योगी, प्रा. एस. के. बावकर सर्व प्रयोगशाळा सहाय्यकांसह, सर्व विद्यार्थ्यांशी संवाद साधून विभागाच्या सर्व प्रयोगशाळा आणि वर्गखोल्यांचा शोध घेतला. सर्व कर्मचारी सदस्य व प्रयोगशाळा प्रभारी यांनी प्रयोगशाळेतील संबंधित प्रात्यक्षिकांची माहिती दिली. प्रा. जी. ए. कुलकर्णी यांनी सर्वांचे आभार मानले.

**कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभाग**

संगणक विभागातील विद्यार्थी यांच्यासाठी दि. १९ ते २१ सप्टेंबर २०२४ तीन दिवस ''IOT वर्कशॉप'' Dolphin LAB आयोजित करण्यात आले होते.

प्रथम वर्ष विद्यार्थी यांचे संगणक विभागात दि. १४ २०२४ दिवशी इंडक्शन प्रोग्रॅम आयोजित केला होता. सर्व विद्यार्थी यांना प्रा.दिपक सपकाळ यांनी मार्गदर्शन केले.

संगणक विभाग प्रमुख प्रा. उर्मिला कलशेट्टी यांनी उपक्रम समन्वयक म्हणून आय. आय. टी., बॉम्बे, यांचेकडून दि. १४ सप्टेंबर २०२४ रोजी आयोजित ''Benefits of Spoken Tutorial in Accreditation'' कार्यशाळेत सहभाग घेतला.

**इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभाग**

बुधवार, दि. २५ सप्टेंबर २०२४ रोजी इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग स्टुडंट्स असोसिएशन (EESA) च्या वर्ष २०२४-२५ साठीच्या उपक्रमांचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाकरीता आदरणीय पद्मश्री मुरलीकांत पेटकर, भारताचे पहिले पॅरालिम्पिक सुवर्ण पदक विजेते हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच विद्युत विभागातील २००७ सालातील माजी विद्यार्थी श्री. सुनय शाह, डायरेक्टर, नवितास ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज व डायरेक्टर, महती इलेक्ट्रिकल, हे सुद्धा उपस्थित होते.

दोन्ही सन्माननीय पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना ''भविष्यातील आव्हाने व संधी'' या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमात EESA तर्फे वर्षभरात आयोजित करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. सांस्कृतिक सादरीकरणाने कार्यक्रमाची सांगता झाली.

शनिवार दि. १४ सप्टेंबर २०२४ रोजी विभागामध्ये २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात नव्याने दाखल झालेल्या प्रथम वर्ष विद्युत अभियांत्रिकी मधील विद्यार्थ्यांसाठी ''इलेक्ट्रिकल डिपार्टमेंट ओरिएंटेशन'' आयोजित करण्यात आले होते. यामध्ये मुलांना विद्युत अभियांत्रिकी विभागा मधील सर्व विभाग दाखवून विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली.

या उपक्रमाची सुरुवात सर्वप्रथम ''विद्युत अभियांत्रिकी मधील उपलब्ध संधी'' या विषयावर विभाग प्रमुख डॉ. मंगेश ठाकरे यांनी मुलांना मार्गदर्शन केले. त्यानंतर प्रा. राधा रांजेकर, प्रा. ओंकार पावसकर आणि प्रा. गौरी कर्वे यांनी मुलांना विद्युत अभियांत्रिकी विभागा मधील सर्व विभागाची विद्यार्थ्यांसमवेत प्रत्यक्ष भेट देऊन माहिती दिली. प्रा. सुरेश यमल्ला यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन केले. विद्यार्थी प्रतिनिधी कौशल, वैभव आणि अमेय यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी काम करणाऱ्या इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग स्टुडंट्स असोसिएशन (EESA) या उपक्रमाबद्दल माहिती दिली.

द्वितीय वर्ष विद्युत अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थ्यांची वार्षिक शैक्षणिक सहल, शनिवार दि. १० ऑगस्ट रोजी Automatic Electrical (AE) लोणावळा येथे आयोजित करण्यात आली होती. प्रा. ओंकार पावसकर, प्रा. उदय सरोदे आणि प्रा. सौ. कल्याणी कुरुंदकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**ए आय डी एस अभियांत्रिकी विभाग**

नाविन्यपूर्ण कार्यशाळा आणि मुलांना नवीन अनुभव देणे यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि डेटा सायन्स विभाग नेहमी प्रयत्नशील असतो.

१) द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी नवीन अनुभव म्हणून ARENA या मल्टिमिडीया कंपनीला भेट आयोजित करण्यात आली होती. तिथे ऍनिमेशन, कॉम्पुटर ग्राफिक्स आणि AI चे ऍनिमेशन मधले महत्त्व या विषयी छोटे छोटे चर्चासत्र घेतले गेले.

२) या विभागाने सप्टेंबर महिन्यात ''Date Structure using Python'' या विषयावर व्याख्यानमाला आयोजित केली होती. त्याच बरोबर विभागाच्या प्रगतीसाठी वेळोवेळी अपेक्षित असलेले मार्गदर्शन घेण्यासाठी ''Department of Advisory Board'' मीटिंग दि. १४ सप्टेंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आली होती. या मीटिंगला १) रामुका मुरारी, गूगल २) डॉ. परीक्षित महल्ले, Dean, R & D, VIT ३) श्री प्रसाद कुलकर्णी, Vice - President, SCHMERSAL ४) रोहित अगरवाल (माजी विद्यार्थी), गूगल या मान्यवरांनी विभागासाठी

Autonomy च्या दृष्टीने योग्य ते मार्गदर्शन केले. या मीटिंग मध्ये पहिल्यांदा प्लेसमेंट झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्याच बरोबर ज्यांनी स्वतःची कंपनी / कॉन्सलटिंग सुरु केले आहे त्या सार्थक करंदीकर आणि कबीर मर्चंट या विद्यार्थ्यांचा देखील सत्कार करण्यात आला.

३) माहे ऑगस्ट मध्ये या विभागाच्या पहिल्या बॅचच्या कु. आकाश पंडित आणि कु. अजय अवचर या २ विद्यार्थ्यांची राजा सॉफ्टवेअरमध्ये ७ लाख प्रति वर्ष, या पॅकेजने निवड होऊन प्लेसमेंटला छान सुरूवात झाली.

४) दि. ३१ ऑगस्ट २०२४ या विभागातर्फे Lotlite या कंपनीबरोबर MoU करण्यात आला. इंडस्ट्री आणि अकॅडेमि यामधील दुआ साधण्यासाठी हा MoU करण्यात आला.

५) विभागप्रमुख डॉ. सौ. मीनाक्षी अत्रे यांना VIT महाविद्यालयामध्ये दि. ५ सप्टेंबर २०२४ रोजी इंटर्नल Hackathon साठी Judge म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.

**इन्फर्मेशन इंजिनिअरिंग विभाग**

दि. २२ ऑगस्ट २०२४ रोजी ITSA उद्घाटन सोहळ्याची सुरुवात मान्यवरांचे स्वागत, गणेश वंदना आणि ITSA बॅनरचे अनावरण याने झाली, त्यानंतर नवीन उपक्रम आणि च्या कार्यशाळा व सेमिनारद्वारे शैक्षणिक आणि औद्योगिक गरजांमधील अंतर कमी करण्याच्या योजनेवर श्री. चिन्मय जयस्वाल, इक्वल सॉफ्टवेअरचे सिनियर सॉफ्टवेअर इंजिनियर यांचे प्रेरणादायक भाषण झाले.

ITSA Technical Session – "Emerging Trends in Technology

दि. २० सप्टेंबर २०२४ रोजी ITSA ने श्री. राहुल देशपांडे EVP Global Head of Research and Development at Mastercard, St Louis, Missouri, United States यांच्या मार्गदर्शनाखाली उदयोन्मुख तंत्रज्ञानातील ट्रेंड्सवर सत्र आयोजित केले होते. क्वांटम संगणन आणि जनरेटिव्ह एआय, ज्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरसाठी मौल्यवान माहिती मिळाली.

**ITSA Ice Breaking Session**

दि. २१ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या आइस-ब्रेकिंग सत्रात मजेशीर खेळ आणि टीम-बिल्डिंग उपक्रमांचा समावेश होता, ज्यामुळे ITSA सदस्यांमध्ये सहकार्य आणि दीर्घकाळ टिकणाऱ्या मैत्रीचे बंध निर्माण झाले.

**फर्स्ट इयर इंजिनिअरिंग विभाग**

प्रथम वर्ष विभागाने, पुणे विभाग, गोखले इन्स्टिट्यूट, एनर्जी स्वराज फाउंडेशन आणि किर्लोस्कर वसुंधरा यांच्या संयुक्त विद्यमानाने दि. २ ते ६ सप्टेंबर २०२४ या कालावधीत ''शाश्वत विकासाची विशिष्ट क्षेत्रे (Niche Areas of Suatainable Development )'' (ISNASD'24) या विषयावर ५ दिवसीय ऑनलाइन आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे (Symposium) आयोजन केले होते.

या परिसंवादाचा उद्देश जगभरातील शिक्षणतज्ज्ञ, संशोधक, विद्यार्थी आणि इतरांना एकत्र आणून शाश्वत विकासाच्या अधोसंशोधित पैलूंचा शोध घेणे आणि जागतिक शाश्वतता विषयावर योगदान देऊ शकतील अशा कल्पनांना प्रोत्साहन देणे हा होता.

या परिसंवादात भारतासह ८ देशांमधून हजारांहून अधिक नोंदणी झाली. या कार्यक्रमादरम्यान १६ प्रबोधनात्मक सत्रे घेण्यात आली. एकूण १६ प्रतिष्ठित संसाधन व्यक्तींना या चर्चेसाठी आमंत्रित करण्यात आले होते. त्यापैकी ३ आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठित व्यक्ती होते. Solar Man of India डॉ. चेतनसिंग सोलंकी यांनी उद्घाटन व मुख्य भाषण करून या परिसंवादाची सुरुवात झाली. या परिसंवादाचा समापन जलऋषी श्री विनोद बोधनकर यांचे वैधानिक भाषणात करण्यात आले. परिसंवादाचे विषय खालील प्रमाणे होते

१. २१ व्या शतकातील सस्टैनबिलिटी
२. शाश्वत अर्थव्यवस्था
३. शाश्वत विकास: सार्वत्रिक मानवी मूल्ये दृष्टीकोन

४. मूर्त ऊर्जा समजून घेणे ''शाश्वततेचा मार्ग''
५. शाश्वत विकासामध्ये तंत्रज्ञानाची भूमिका
६. शाश्वत विकासामध्ये जैवविविधतेची भूमिका
७. शाश्वत शेती तंत्र
८. मृदा आणि जमीन संवर्धन
९. ग्रीन वॉशिंग आणि ग्रीन हशिंग
१०. 'फेकणे' म्हणजे काय?
११. विषमुक्त जीवनशैली
१२. जीवन चक्र मूल्यांकन
१३. सांडपाणी प्रक्रिया
१४. टिकाऊपणाचे अर्थशास्त्र : व्यवसायात दीर्घकालीन मूल्य निर्मिती.

या परिसंवादास उदंड प्रतिसाद मिळाला. या परिसंवादाचे संयोजक प्रा. अर्चना मिराशी, समन्वयक प्रा. लक्ष्मी सोवनी, प्रा. रंजीता घोष, प्रा. रुपाली गिरमे प्रा. रोहन विचारे, प्रा.अश्विनी सैंदाणे, विद्यार्थी स्वयंसेवक कु. अफान, कु. श्रेया, कु. कौशल, कु. वेदांग हे होते.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे प्रवेश ५७३ विद्यार्थ्यांच्या विक्रमी प्रवेशासह यशस्वीरित्या पूर्ण झाले.

दि. १३ सप्टेंबर २०२४ रोजी महाविद्यालयाच्या सभागृहात नव्याने प्रवेश घेतलेल्या प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी आणि त्यांच्या पालकांसाठी स्वागत समारंभ घेण्यात आला. कार्यक्रमात संचालक, प्राचार्य व विभागप्रमुख उपस्थित होते. २०२४-२५ साठी विद्यार्थी इंडक्शन कार्यक्रम सुरू झाला आहे.

### एमबीए विभाग

### जागतिक ओझोन दिन

सोमवार दि. १६ सप्टेंबर २०२४ रोजी जागतिक ओझोन दिनानिमित्त महाविद्यालयाच्या प्रांगणात विद्यार्थी व प्राध्यापकांच्या हस्ते दि. १९ सप्टेंबर २०२४ रोजी जायफळ, अडुळसा, कोरफड, तुळशी, अपराजिता अशा औषधी वनस्पतींचे वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षारोपणाचे महत्त्व सांगण्यात आले.

### स्पोर्ट विभाग

दि. २९ ऑगस्ट २०२४ रोजी मेजर ध्यानचंद यांच्या जयंती निमित राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला. क्रीडा आणि शरीरिक शिक्षण विभागाने टेबल टेनिस, बास्केटबॉल आणि प्लाँक होल्ड चॉलेंज इत्यादी उपक्रम राबविले होते, यामध्ये एकूण १३० विद्यार्थी, २८ प्राध्यपक / कर्मचारी हे विविध उपक्रमात सहभागी झाले होते. राष्ट्रीय क्रीडा दिनाचे उद्घाटन संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर, प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे, जिमखाना समिती सदस्य यांच्या उपस्थितीत करण्यात आले. संचालक श्री. सुनिल रेडेकर यांच्या मार्गदर्शनातून राष्ट्रीय क्रीडा दिनाचे आयोजन क्रीडा विभाग प्रमुख डॉ. नामदेव बन्ने आणि सर्व विभागांचे क्रीडा समन्वयक यांनी केले होते.

### उद्योजकता विकास केंद्र आणि ट्रेनिंग / प्लेसमेंट विभाग

दि. ३१ ऑगस्ट २०२४ रोजी उद्योजकता विकास केंद्र व ट्रेनिंग/ प्लेसमेंट विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'ग्राफिक्स प्रोसेसिंग युनिट' या विषयावर एक संवाद सत्र आयोजित करण्यात आले. यावेळी श्री. आदित्य राणे (गुगल इंडिया), श्री आनंद मुगलीकर, श्री गौरव त्रिपाठी (पार्टेक्स ग्रुप) यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले

फिलिप्स, सिमेंस व आयबीएम च्या प्रतिनिधींनी महाविद्यालयास भेट दिली व नवीन शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमामध्ये काय बदल करता येईल या संदर्भात प्राचार्य व संचालक यांच्याशी चर्चा केली.

सप्टेंबर महिन्यात ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागद्वारा कम्प्युटर कोडींगवर आठवडाभर ट्रेनिंग आयोजित करण्यात आले. श्री अविनाश पोरे, प्रा. पायल तायडे, प्रा. डॉ. मीनाक्षी अत्रे, प्रा. डॉ. एन. जी. जयस्वाल यांनी वरील कार्यक्रमांचे आयोजन केले. सदर कार्यक्रमांना प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे, संचालक श्री. सुनील रेडेकर व प्रा. राजेंद्र कडुसकर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

***

# शिक्षणशास्त्र व संशोधन महाविद्यालय, म्हसरूळ, नाशिक

**कार्यवाह : संजय नि. गुंजाळ**
**प्राचार्य : डॉ. सुरेश पाटील**

### शिक्षक दिन साजरा

दि. ५ सप्टेंबर २०२४ रोजी भारतातील महान शिक्षणतज्ज्ञ भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांची जयंती 'शिक्षक दिन' म्हणून साजरा करण्यात येते. प्राचार्य डॉ. सुरेश पाटील यांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरूवात करण्यात आली. या कार्यक्रमासाठी प्रा. मनीषा पाटील, प्रा. डॉ. अरविंद जिंजर, प्रा. डॉ. रबाब भगत, प्रा. रोहिणी भालेराव, प्रा. अनीता बोडके, प्रा. दिलीप अहिरे, लेखनिक सौ. अर्चना जोशी, श्री. सखाराम गायकवाड उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दिलीप अहिरे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. अरविंद जिंजर यांनी केले. आपल्या भाषणात बोलताना प्राचार्य डॉ. सुरेश पाटील यांनी सांगितले की, भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् हे भारतातील महान शिक्षणतज्ज्ञ, तत्त्वज्ञ आणि राजकीय नेते होते. त्यांनी आपले संपूर्ण जीवन शिक्षण क्षेत्रासाठी आणि मानवतेच्या उन्नतीसाठी समर्पित केले. भारताचे पहिले उपराष्ट्रपती व दुसरे राष्ट्रपती म्हणून त्यांनी आपल्या कार्यकाळात भारतीय शिक्षण प्रणाली आणि तत्त्वज्ञानाचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांच्या स्मरणार्थ ५ सप्टेंबर हा दिवस 'शिक्षक दिन' म्हणून साजरा केला जातो. प्रा. मनीषा पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### गुणगौरव समारंभ संपन्न

दि. ५ सप्टेंबर २०२४ रोजी महाविद्यालयातील प्रथम व द्वितीय वर्ष बीएड अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुरेश पाटील होते. याप्रसंगी व्यासपीठावर प्रा. मनीषा पाटील, प्रा. डॉ. अरविंद जिंजर, डॉ. रबाब भगत, प्रा. रोहिणी भालेराव, प्रा. अनिता बोडके, प्रा. दिलीप अहिरे, लेखनिक सौ. अर्चना जोशी उपस्थित होते.

याप्रसंगी प्रथम वर्ष बी.एड्. परीक्षेत उत्तीर्ण झालेले वैष्णवी शेवाळे, सोनाली पाटील, सोनल बोरसे, वनिता भडांगे, ऋतुजा गीते आणि द्वितीय वर्ष बी.एड्. परीक्षेत उत्तीर्ण झालेले सारिका पाटील, लतिका गटकळ, मुस्कान सिंग, उन्नती खर्चे, हरीश चतुर्वेदी यांचा पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला. याप्रसंगी शाम रिठे, सोनल बोरसे, दिनेश बच्छाव, मोनिका पागेरे, साधना मेतकर, हर्षदा सोनार यांनी मनोगत व्यक्त केले. स्वागत गीत आकांक्षा खैरनार यांनी सादर केले. सूत्रसंचालन ऋतुजा गीते यांनी केले तर पल्लवी मोरे यांनी आभार मानले. साधना मेतकर यांनी कार्यक्रमाची सांगता पसायदानाने केली. सर्व गुणवंत प्रशिक्षणार्थी शिक्षकांचे कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांनी अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

### हिंदी दिन उत्साहात साजरा

महाविद्यालयात 'हिंदी दिन' साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुरेश पाटील होते. याप्रसंगी प्रा. मनीषा पाटील, प्रा. डॉ. अरविंद जिंजर, प्रा. डॉ. रबाब भगत, प्रा. रोहिणी भालेराव, प्रा. दिलीप अहिरे उपस्थित होते. यावेळी शाम रिठे, ऋतुजा गीते, साधना मेतकर, अस्मिता पटेल, अजय पाखले, स्वाती मेतकर, श्रेया शिंदे, वैष्णवी शेवाळे, साक्षी साळवे, पूजा सहाणे आदींनी हिंदी दिनाचे महत्त्व सांगून हिंदी कविता व गाण्यांचे सादरीकरण केले. प्रा.अनिता बोडके यांनी हिंदी दिनाचे महत्त्व व इतिहास सांगितला. प्राजक्ता आव्हाड यांनी सूत्रसंचालन केले. स्वाती मेतकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी शिक्षकांनी तयार केलेल्या हिंदी साहित्याचा प्रसार व महत्त्व दर्शविणाऱ्या साहित्याचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. प्रथम व द्वितीय वर्षाचे सर्व प्रशिक्षणार्थी शिक्षक उपस्थित होते.

## वाङ्मय मंडळाचे उद्‌घाटन

महाविद्यालयात भाषा वाङ्मय मंडळाचे उद्‌घाटन ज्येष्ठ साहित्यिक व माजी प्राचार्य डॉ. दिलीप धोंडगे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुरेश पाटील होते. प्राचार्य डॉ. दिलीप धोंडगे यांनी सांगितले की, हात आणि भाषा या दोन साधनांमुळे माणसाचे निर्मितीशील प्राणी म्हणून वेगळेपण सिद्ध झाले. भाषा या साधनाचे काही प्रमाणात माध्यमात रूपांतर झाले की साहित्य निर्माण होते. वाङ्मय प्रकारानुसार भाषेचा कस लागून साहित्य निर्मिती होते. भाषा साहित्य निर्माण करते तसेच भाषा ही अभिव्यक्तीची पद्धत आहे. आज गद्य आणि पद्य दोन्ही अंगानी आणि प्रकारांनी साहित्य सादर होत आहे. कविता, गीत, अभंग तसेच कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन व चरित्र अशा विविध प्रकारांनी साहित्य निर्माण होत आहे. स्वागत व प्रास्ताविक प्रा. दिलीप अहिरे यांनी केले. याप्रसंगी प्रा. मनीषा पाटील, प्रा. डॉ. अरविंद जिंजर, प्रा. डॉ. रबाब भगत, प्रा. रोहिणी भालेराव, प्रा. अनिता बोडके, सौ. अर्चना जोशी, सखाराम गायकवाड उपस्थित होते. प्रारंभी कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली भाषा व वाङ्मय मंडळाच्या विभागाने प्रदर्शित केलेल्या सारस्वतांच्या चित्रमय माहितीच्या प्रदर्शनाचे उद्‌घाटन करण्यात आले. मोनिका पागेरे व ऋतुजा गीते यांनी मराठी व हिंदी भाषेचे महत्त्व आपल्या मनोगतातून व्यक्त केले. प्राजक्ता आव्हाड यांनी सूत्रसंचालन केले. प्रा.मनीषा पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी

दि. २ ऑक्टोबर २०२४ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधीजी व लाल बहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. प्राचार्य डॉ. सुरेश पाटील यांच्या हस्ते प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. प्राचार्य डॉ. सुरेश पाटील यांनी महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या कार्याविषयी माहिती सांगितली. याप्रसंगी प्रा. मनीषा पाटील, प्रा. डॉ. अरविंद जिंजर, प्रा. डॉ. रबाब भगत, प्रा. रोहिणी भालेराव, प्रा. अनिता बोडके, प्रा. दिलीप अहिरे, सौ. अर्चना जोशी, सखाराम गायकवाड आणि महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी विद्यार्थी उपस्थित होते. ***

### * शिक्षणशास्त्र व संशोधन महाविद्यालय, म्हसरूळ, नाशिक *



प्रथम व द्वितीय वर्ष बीएड अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या गुणगौरव समारंभ प्रसंगी उपस्थित प्राचार्य डॉ. सुरेश पाटील, प्राध्यापक आणि विद्यार्थिनी शिक्षिका




राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती कार्यक्रम प्रसंगी उपस्थित प्राचार्य डॉ. सुरेश पाटील प्राध्यापक आणि सेवक

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, पुणे विभाग

**कोषाध्यक्ष – श्री. कृष्णाजी कुलकर्णी**

**दि. १.९.२०२४ ते ३०.९.२०२४**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे.**
**संस्थेविषयी दर्शवित असलेल्या आत्मीयतेबद्दल आम्ही सर्वांचे आभारी आहोत.**
**(देणगी व्याजाचा विनियोग देणगी प्राप्त झाल्यानंतर पुढील वर्षापासून १५ वर्षांपर्यंत केला जातो.)**

देणगी रु. १०,००१/- वरील सर्व

**●नाव** - **श्री. नयन जयंतीलाल शहा, पुणे**
**देणगी** - रु. १,४०,०००/-
**दिनांक** - ११.९.२०२४
**निमित्त** - कै. दीपक जयंतीलाल शहा (भाद्रपद वद्य १०) कै. सौ. विजयालक्ष्मी जयंतीलाल शहा, (भाद्रपद वद्य २) आप्तेष्टांचे पुण्यस्मरणार्थ (भाद्रपद वद्य २ ते भाद्रपद वद्य ३० पर्यंत)
**विनियोग** - देणगी व्याज विनियोग मिष्टान्न


अनंत विनायक भट

**●नाव** - **ब्रिगेडियर अभय अनंत भट, पुणे**
**देणगी** - रु. १,००,०००/-
**दिनांक** - २३.९.२०२४
**निमित्त** - कै. अनंत विनायक भट यांचे स्मृतिदिनानिमित्त (२५ सप्टेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदत देण्यासाठी

**●नाव** - **श्री. रमेशचंद्र गोविंद कुलकर्णी, (मा. वि.), पुणे**
**देणगी** - रु. १,००,०००/-
**दिनांक** - २३.९.२०२४
**निमित्त** - माजी विद्यार्थी ऋणविमोचनार्थ
**विनियोग** - संस्थावाढीसाठी

**●नाव** - **श्री. संदिप मुकुंद देवधर, पुणे**
**देणगी** - रु. ३०,०००/-
**दिनांक** - २८.९.२०२४
**निमित्त** - कै. स्मिता मुकुंद देवधर (१ नोव्हेंबर) आणि (१९ ऑगस्ट) यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी रु. १५,०००/- संपूर्ण रकमेचा विनियोग श्रीखंडाचे मिष्टान्नासह संपूर्ण भोजन, देणगी रु. १५,०००/- व्याजविनियोग अन्नदान

**●नाव** - **ग्रुप कॅप्टन अे. जी. बेवूर, पुणे**
**देणगी** - रु. २५,०००/-
**दिनांक** - २०.९.२०२४
**निमित्त** - कै. गुरूनाथ बेवूर, कै. रुक्मिणी बेवूर, कै गोपाळ बेवूर, कै. प्रभाकर सापटणेकर, कै. मंगला सापटणेकर, कै. विकास सापटणेकर, कै. गोविंद बेवूर यांचे स्मृतीदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**●नाव** - **श्रीमती मुग्धा श्रीनिवास राजन, पुणे**
**देणगी** - रु. २४,०००/-
**दिनांक** - १०.९.२०२४
**निमित्त** - कै. दिंगबर दत्तात्रय गोगटे (२२ सप्टेंबर) कै. श्रीनिवास गोविंद राजन (२३ सप्टेंबर) यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

**●नाव** - **श्रीमती शिवानी वैद्य, पुणे**
**देणगी** - रु. २०,०००/-
**दिनांक** - २१.९.२०२४
**निमित्त** - कै. प्रकाश वैद्य, कै. नीलिमा वैद्य, कै. मालती वैद्य, कै. श्रीपाद वैद्य यांचे स्मृतिदिनानिमित्त (भाद्रपद वद्य ४)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

**●नाव** - **सौ. ऐश्वर्या अनिरुध्द जोशी, पुणे**
**देणगी** - रु. २०,०००/-
**दिनांक** - ३०.९.२०२४
**निमित्त** - कै. महादेव मोरेश्वर साठे (मा. वि.) यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

**●नाव** - **कु. विभा पाण्डे, लखनऊ**


आभा पाण्डे


रमा पाण्डे


डॉ. बी. पी. पाण्डे

**देणगी** - रु. १८,०००/-
**दिनांक** - १९.९.२०२४
**निमित्त** - कै. आभा पाण्डे, कै. रमा पाण्डे, कै. डॉ. बी. पी. पाण्डे यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदत


वत्सला ठाकूर

**●नाव** - **श्री. मधुकर बापुराव ठाकूर, यु एस ए**
**देणगी** - रु. १५,००१/-
**दिनांक** - ७.९.२०२४
**निमित्त** - कै. वत्सला बापु ठाकूर यांचे जयंतीनिमित्त (३ सप्टेंबर)
**विनियोग** - पूर्वीच्या देणगीमध्ये समाविष्ट करून येणाऱ्या व्याजाचा विनियोग शैक्षणिक मदत

**●नाव** - **श्री. रमेश नाफडे, पुणे**
**देणगी** - रु. १५,०००/-
**दिनांक** - १०.९.२०२४
**निमित्त** - गणेशोत्सवानिमित्त (८ सप्टेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

**●नाव** - **श्री. आदित्य सतीश देशपांडे, पुणे**
**देणगी** - रु. १५,०००/-
**दिनांक** - २०.९.२०२४
**निमित्त** - कै. चि. रिदान आदित्य देशपांडे यांचे स्मृतिदिनानिमित्त (भाद्रपद वद्य ३०)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

**●नाव** - **श्री. मुकुंद मोरेश्वर देशपांडे, पुणे**
**देणगी** - रु. १५,०००/-
**दिनांक** - २०.९.२०२४
**निमित्त** - कै. पांडुरंग विनायक कुलकर्णी यांचे स्मृतिदिनानिमित्त (३ ऑक्टोबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

●**नाव** - **श्रीमती सुनिती बी. गोखले, मुंबई**
**देणगी** - रु. १५,०००/- **दिनांक** - २०.९.२०२४
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांना दि. २२ सप्टेंबर २०२४ रोजी मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

●**नाव** - **श्री. सुमित सुरेश महाडिक, पुणे**
**देणगी** - रु. १५,०००/-**दिनांक** - २६.९.२०२४
**निमित्त** - कै. सुरेश बाबुराव महाडिक व कै. सौ. ज्योती सुरेश महाडिक यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन


सुमंगला उपाध्ये

● **नाव** - **श्री. शांताराज रत्नपाल उपाध्ये, पुणे**
**देणगी** - रु. १५,०००/-
**दिनांक** - २७.९.२०२४
**निमित्त** - कै. सौ. सुमंगला शांताराज उपाध्ये यांचे स्मृतिदिनानिमित्त (२ नोव्हेंबर)
**विनियोग** - देणगी व्याज विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन


उषाताई नातू

●**नाव** - **श्रीकृष्ण गदाधर नातू, पुणे**
**देणगी** - रु. १३,५००/-
**दिनांक** - १९.९.२०२४
**निमित्त** - कै. श्रीमती उषाताई गदाधर नातू यांचे स्मृतिदिनानिमित्त (१० ऑक्टोबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

●**नाव** - **संयुक्ता रेडे, ठाणे**
**देणगी** - रु. १२,०००/-
**दिनांक** - २५.९.२०२४
**निमित्त** - सर्वपित्री अमावस्येनिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

●**नाव** - **सौ. मृदुला प्रभाकर चिरमुले, पुणे**
**देणगी** - रु. ११,५००/-
**दिनांक** - ५.९.२०२४
**निमित्त** - कै. प्रभाकर गोपाळ चिरमुले यांचे स्मृतिदिनानिमित्त (६ सप्टेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन


डॉ. गजानन सुदामे

●**नाव** - **श्रीमती शीला गजानन सुदामे, पुणे**
**देणगी** - रु. ११,०००/-
**दिनांक** - २.९.२०२४
**निमित्त** - कै. डॉ. गजानन रघुनाथ सुदामे यांचे स्मृतिदिनानिमित्त (९ सप्टेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदत

●**नाव** - **श्री. समीर वसंत पेंडसे, पुणे**
**देणगी** - रु. ११,०००/-
**दिनांक** - २७.९.२०२४
**निमित्त** - श्रीमती लक्ष्मीबाई नारायण कानिटकर यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. घनःश्याम दिगबर केंजळे, पुणे**
**देणगी** - रु. १०,००१/-
**दिनांक** - २०.९.२०२४
**निमित्त** - कै. दिगंबर मारुती केंजळे यांचे प्रथम स्मृतिदिनानिमित्त (२० सप्टेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

**देणगी रु. ५,००१/- ते रु. १०,०००/-**


बाळासाहेब धायबर

●**नाव** - **श्री. विवेक बाळासाहेब धायबर, पुणे**
**देणगी** - रु. १०,०००/-
**दिनांक** - ३.९.२०२४
**निमित्त** - कै. बाळासाहेब यशवंत धायबर यांचे स्मृतिदिनानिमित्त (१९ ऑक्टोबर)
**विनियोग** - देणगी व्याज विनियोग अन्नदान


विनायक कानेटकर

●**नाव** - **सौ. अर्चना अशोक पाध्ये, मुंबई**
**देणगी** - रु. १०,०००/-
**दिनांक** - ३.९.२०२४
**निमित्त** - कै. विनायक पुरुषोत्तम कानेटकर यांचे स्मृतिदिनानिमित्त (वैशाख शुध्द ७)
**विनियोग** - देणगी व्याज विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. जयंत श्रीराम देशपांडे, पुणे**
**देणगी** - रु. ९,०००/-
**दिनांक** - ५.९.२०२४
